मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले


● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१६ ■ शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# उकाड्यानं नागरिक त्रस्त; पुढील काही दिवस चार जिल्ह्यात उष्ण लाटेचा इशारा

**मुंबई :** एप्रिल महिन्याच्या मध्यातच मुंबईत उन्हाळ्याचा जोर लक्षणीयरीत्या वाढला आहे. शहरात उष्ण आणि दमट हवामानाचा प्रभाव तीव्रपणे जाणवत आहे. आज मुंबईतील कमाल तापमान 33 ते 36 अंश सेल्सिअस दरम्यान, तर किमान तापमान 26 ते 28 अंशांच्या आसपास राहील, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. मात्र, वाढलेल्या आर्द्रतेमुळे 'फील्स लाईक' तापमान 38 अंशांपर्यंत जाण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रत्यक्ष तापमानापेक्षा अधिक उकाडा सहन करावा लागत आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, सध्या मुंबईच्या बहुतांश ठिकाणी स्वच्छ आकाश आहे. त्यामुळे पावसाची शक्यता अत्यंत कमी आहे. समुद्रकिनारी भागात हलक्या वाऱ्यासह दमट वातावरण कायम राहील. विशेषतः दुपारच्या वेळेत सूर्यप्रकाश तीव्र असल्यानं उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत असून नागरिकांना बाहेर पडताना त्रास



सहन करावा लागत आहे.

**काळजी घेण्याचं आवाहन** - वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन केलं आहे. त्यांनी दुपारी 12 ते 4 या वेळेत अनावश्यक बाहेर पडणे टाळावं, असा स्पष्ट इशारा दिला आहे. उष्माघाताचा धोका लक्षात घेता नागरिकांनी भरपूर पाणी पिणं, डोक्यावर संरक्षण ठेवणं, तसेच हलके आणि सैल कपडे परिधान करणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी, असेही त्यांनी नमूद केलं. यासोबतच प्रशासन आणि आरोग्य यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट** - महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये उष्णतेची लाटसदृश परिस्थिती निर्माण झाल्यानं मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांमध्ये तापमान 40 अंशांच्या जवळ जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर जाणं टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. मुंबईमधील आजचा एक्यूआय 108 असून मुंबईच्या एक्यूआयनुसार सध्या मुंबईतील हवा 'मध्यम' श्रेणीत नोंदवली जात आहे. वाहनांचा धूर, बांधकामांमधून उडणारी धूळ आणि उष्ण हवामान यामुळे प्रदूषणात किंचित वाढ झाली आहे. त्यामुळे श्वसनाच्या त्रास असलेल्या नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आवाहन-** एप्रिल महिन्यात सामान्यतः तापमान 27 ते 34 अंशांच्या दरम्यान राहते. मात्र, यंदा उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. दिवसाचं तापमान वाढल्यानं आणि रात्रीही उबदार वातावरण कायम राहिल्यानं नागरिकांची गैरसोय वाढली आहे. प्रशासनानं नागरिकांना सतर्क राहण्याचं आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आवाहन केलं आहे. पुढील काही दिवस उष्णतेचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे.

## पुढील काही दिवस उष्णतेचा तडाखा

विदर्भात सूर्यदेव अक्षरशः कोपल्यानं जनजीवन होरपळून निघत आहे. बुधवारी विदर्भातील बहुतांश शहरांमध्ये तापमान 42 ते 44 अंशांच्या दरम्यान पोहोचलं आहे. बुधवारी सर्वाधिक तापमान अकोल्यात नोंदवलं गेलं असून पारा तब्बल 44.2 अंशांवर गेला आहे. अमरावतीत 44 अंश, वर्ध्यात 43.9 आणि नागपुरात 43.4 अंश तापमानाची नोंद झाली आहे. चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये 42.6, तर यवतमाळमध्ये 42.8 अंश तापमान नोंदवलं गेलं आहे. बुलढाण्यात 42.2, गोंदियात 42 आणि भंडाऱ्यात 41 अंश तापमानाची नोंद झाली आहे. या तीव्र उष्णतेमुळे रस्ते ओस पडले आहेत. दुपारच्या वेळेत बाहेर पडणं नागरिक टाळत आहेत. हवामान खात्यानं पुढील काही दिवस उष्णतेचा तडाखा आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. एकूणच, विदर्भात सूर्यदेवाचा प्रकोप वाढत असून येणारे काही दिवस आणखी कठीण जाण्याची शक्यता आहे.

# मुख्यमंत्र्यांनी केले दिव्यांग जलपरी ईश्वरी पांडेच्या विश्वविक्रमी मोहिमेचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : जगातील पहिली दृष्टिहीन जलतरणपटू सतरा वर्षीय कुमारी ईश्वरी कमलेश पांडे हिने धोकादायक असलेल्या तलाईमन्नार (श्रीलंका) ते धनुष्कोडी (भारत) या ३८ सागरी कि.मी. अंतराची पाल्कची समुद्रधुनी अवघ्या ११ तास १५ मिनिटात यशस्विरीत्या पूर्ण करून विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. ही ऐतिहासिक मोहीम फत्ते करणारी ईश्वरी ही पहिली दृष्टिहीन जलतरणपटू ठरली आहे. तिच्या या धाडसाचे तसेच विक्रमाचे कौतुक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

पाल्कच्या समुद्रधुनीसारखी अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक मोहीम यशस्वी केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ईश्वरीचे विशेष शुभेच्छा संदेशाद्वारे अभिनंदन केले आहे. तुझी ही विश्वविक्रमी मोहीम अनेकांसाठी प्रोत्साहन ठरणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

अथांग सागरातील महाकाय लाटा आणि आव्हानात्मक परिस्थितीवर मात करीत संपादन केलेले यश अभिमानास्पद आहे. तुझ्या अंगी असलेले हे धाडस आणि जिद्द आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. या यशसासाठी पाठबळ देणाऱ्या कुटुंबीयांचे तसेच प्रशिक्षक, मार्गदर्शकांचेही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे. तसेच पुढील सर्व मोहिमांसाठी आणि उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

नागपूर येथील मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रसिद्धी समन्वयक अधिकारी अनिल गडेकर व अविनाश महालक्ष्मे यांनी नागपुरातील आशीर्वादनगर येथील कमलेश पांडे यांच्या निवासस्थानी जाऊन ईश्वरी पांडे यांना मुख्यमंत्र्यांतर्फे शुभेच्छा संदेश देऊन अभिनंदन केले.

# पळस्पे येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** शासन आपल्या दारी' या संकल्पनेतून पनवेल तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, पळस्पे येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन शुक्रवार दि.17 एप्रिल रोजी सकाळी 10 वा.करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये शेतकऱ्यांसाठी महाविस्तार AI ॲप नोंदणी व फार्मर आयडी रजिस्ट्रेशन, निवडणूक ओळखपत्राचे SIR मॅपिंग, आधार कार्ड अपडेट, आयुष्यमान भारत कार्ड, आरोग्य सुविधा, कृषी विभागाच्या सुविधा, रेशन कार्ड संबंधित सुविधा, 7/12 संबंधित सुविधा, विविध प्रकारचे दाखले ई अर्ज स्वीकारले जातील आणि दाखल्यांचे वाटप केले जाईल. शिबिरास येताना नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, जमीन विषयक – सात बारा उतारा इ. इतर आवश्यक पूरक कागदपत्रे कागदपत्रे सोबत ठेवावीत. या प्रसंगी प्रांताधिकारी पवन चाडंक, तहसीलदार मिनल भामरे भोसले, नायब तहसीलदार राजश्री जोगी,मंडळ अधिकारी शशिकांत सानप व पळस्पे मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी,महसूल सेवक आणि इतर विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रशासनाने नागरिकांना या शिबिराचा लाभ घेण्यासाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# स्मशानभूमी तथा दफनभमीच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर:** पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात असलेल्या स्मशानभूमी तथा दफनभूमीच्या सुरक्षे करता सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी पनवेलच्या आयुक्तांकडे केली आहे. महानगरपालिका हद्दीत एका स्मशानात मृत व्यक्तीला अग्नी दिल्यानंतर त्याची होणारी राख ही अज्ञात इसमाने चोरून नेली होती. ही बाब चिंताजनक असून मानवी जीवनाची अवहेलना करणारी आहे. अशा प्रकारामुळे भविष्यात परिसरात तणावाचे वातावरण उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महानगरपालिका परिसरात शांतता आणि सुव्यवस्था भंग होण्याची चिन्हे आहेत. याकरता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सुरक्षारक्षक नेमणे गरजेचे असल्याचे विनायक गांधी यांनी म्हटले आहे.

# भाजप विभाग पदवीधर नोंदणी सहप्रमुखपदी एम. के. देशमुख

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/छत्रपती संभाजीनगर:-** भारतीय जनता पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदार नोंदणी सहप्रमुखपदी सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी मधुकरराव (एम. के.) देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई येथील प्रदेश कार्यालयात भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुलजी सावे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवतजी कराड, पदवीधर मतदार नोंदणी प्रमुख आ.संजयभाऊ केनेकर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष किशोरजी शितोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

एम. के. देशमुख यांनी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांत शिक्षणाधिकारी म्हणून, तसेच शिक्षण उपसंचालक कार्यालयात सहाय्यक उपसंचालक म्हणून प्रदीर्घ काळ सेवा दिली आहे. त्यांचा मराठवाडाभर असलेला जनसंपर्क आणि शिक्षण क्षेत्रातील प्रगाढ अनुभव लक्षात घेता, मतदार



नोंदणी मोहिमेला मोठी गती मिळणार आहे. "पक्ष संघटन बळकट करून भाजप उमेदवाराच्या विजयासाठी आपण कटिबद्ध आहोत," असा विश्वास श्री. देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला.

या नियुक्तीबद्दल आ. श्रीमती अनुराधाताई चव्हाण, आ. प्रशांत बंब, महापौर समीर राजूरकर, अनिल मकरिये, संजय खंबायते,सुहास शिरसाट, प्रा. मनोज पाटील, पांडुरंग मांडकीकर, भाऊसाहेब तुपे, आबासाहेब जगताप, अशोकदादा गरुड यांच्यासह मराठवाड्यातील भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, शिक्षण संस्थाचालक व शिक्षक वृंदांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शंकरराव चव्हाण महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर प्रतिनिधी -अरविंद पांचाळ** : ज्ञानाचे अथांग महासागर असणारे, आपल्या कार्य-कर्तृत्वाने सर्वसामान्यांना न्याय देणारे, भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.अजय टेंगसे हे होते. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना डॉ.अजय टेंगसे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य फार मोठे आहे. त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून देशाला राज्यघटना मिळाली व यामाध्यमातून सर्वसामान्यांना सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजनैतिक तसेच आर्थिक न्याय मिळाला,असे ते म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्यावतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य या विषयावर निबंध स्पर्धा तसेच ग्रंथालय विभागाच्यावतीने वाचन दिन इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.साईनाथ शेटोड यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ.काजी मुख्तारोद्दिन यांनी मानले. या जयंती सोहळ्यास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अचलपूर लैंगिक शोषण प्रकरण: SIT चौकशीची मागणी; काँग्रेसचे पोलीस प्रशासनाला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**विदर्भ संपादिका ज्योत्सना करवाडे अमरावती (प्रतिनिधी):** अचलपूर (परतवाडा) येथील तरुणीच्या लैंगिक शोषण प्रकरणाने संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्यासाठी काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. पीडित तरुणीचे आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्या आरोपींना आणि त्यांच्या साथीदारांना मोक्कासह कठोर कलमान्वये शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आज अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक व अमरावती रेंजच्या आयजी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या वेळी प्रकरणाचा तपास विशेष चौकशी पथक (SIT) मार्फत करण्याची ठाम मागणी करण्यात आली.

नेतृत्वाखाली शिष्टमंडळाची भेट

या शिष्टमंडळात आमदार वीरेंद्र जगताप, जिल्हाध्यक्ष बबलूभाऊ देशमुख आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

मान्यवरांची उपस्थिती

माजी आमदार वीरेंद्रभाऊ जगताप, माजी महापौर विलासभाऊ इंगोले, माजी महापौर मिलिंदभाऊ चिमोटे, शहराध्यक्ष बबलूभाऊ शेखावत, नगरसेवक अनिलभाऊ अग्रवाल यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशासनाला इशारा

"अचलपूरमधील ही घटना अत्यंत गंभीर आणि माणुसकीला काळीमा फासणारी आहे. केवळ मुख्य आरोपी नव्हे, तर त्याला मदत करणाऱ्या सर्वांना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर असून, तपासात विलंब झाल्यास काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा नेत्यांनी दिला.

प्रशासनाचे आश्वासन

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दोषींवर तात्काळ आणि कठोर कारवाई केली जाईल, तसेच तपास जलदगतीने पूर्ण केला जाईल, असे आश्वासन पोलीस प्रशासनाने शिष्टमंडळाला दिले आहे.




**खांदा कॉलनीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंती महोत्सवाच्या वेळी नगरसेविका सिताताई पाटील यांनी आपल्या ओम् साई खान्देश्वर महिला व बालमित्र मंडळाच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुकीत मोफत पाणी वाटप केले**

( दैनिक युवक आधार )

# नियमांच्या काटेकोर अंमलबजावणीसह अधिकाऱ्यांनी प्रशासनावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ करणे महत्त्वाचे – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

## राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या ७८ व्या बॅच प्रशिक्षणाचा समारोप

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** 'विनम्रता, संयम आणि संवेदनशीलता हे आदर्श कार्यपद्धतीचे अविभाज्य घटक आहेत. अधिकारी म्हणून आपली जबाबदारी केवळ नियमांची अंमलबजावणी करणे नाही, तर प्रशासनावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ करणे ही आहे. न्याय, पारदर्शकता आणि प्रामाणिकतेच्या आधारावर घेतलेले निर्णय शासन व्यवस्थेला मजबूत करण्यासह देशाच्या सर्वांगीण विकासात योगदान देतात' या शब्दात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या अधिकाऱ्यांना साद घालत भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शन केले.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या (एनएडीटीची) ७८ व्या तुकडीच्या दीक्षांत समारंभात त्या आज बोलत होत्या. एनएडीटीच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्याला राज्यापाल जिष्णू देव वर्मा, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल, महासंचालक सीबीचेन के मॅथ्यु, प्रशासकीय सदस्य पंकजकुमार मिश्रा व मान्यवर उपस्थित होते.

**तंत्रज्ञान हे केवळ साधन; आपली खरी ओळख विवेक, प्रामाणिकता आणि नैतिक दृष्टिकोनात**

आपण देशाच्या आर्थिक प्रगतीचे, सामाजिक न्यायाचे आणि सुशासनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहात. आगामी काळात आपण डिजिटल अर्थव्यवस्था, आंतरराष्ट्रीय व्यवहारांची गुंतागुंत आणि करचुकवेगिरीच्या नव्या पद्धती अशा आव्हानांना सामोरे जाल. या आव्हानांवर मात करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक आहे. डेटा विश्लेषण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या क्षमतांना अधिक बळकट करतील; मात्र तंत्रज्ञान हे केवळ साधन आहे. आपली खरी ओळख आपला विवेक, प्रामाणिकता आणि नैतिक दृष्टिकोन यात आहे हे अधिकाऱ्यांनी सतत लक्षात ठेवावे, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितले.

एनएडीटी ही देशातील एक आदर्श संस्था आहे. येथे कर प्रणाली, संबंधित




कायद्यांच्या शिक्षणासमवेत मूल्यात्मक शिक्षणही दिले जाते. भारताची विकसित राष्ट्राकडे वाटचाल होत असताना एनएडीटीसारख्या संस्थांची जबाबदारी अधिक वाढली असून ही संस्था आपली जबाबदारी समर्थपणे पेलत असल्याचे गौरोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले.

भारतात प्रत्यक्ष कर संकलनात आता सातत्याने वाढ होत आहे. कर अनुपालनात सुधारणा होत आहे. करदात्यांचा आधार विस्तारत आहे. यामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे दिसते. आयकर अधिनियम, २०२५ जो १ एप्रिल २०२६ पासून लागू झाला असून आपली कर प्रणाली आधुनिक, सुलभ आणि पारदर्शक दिशेने वाटचाल करत आहे. या नव्या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये आपण अग्रणी भूमिका बजावणार आहात. त्याची खरी यशस्विता ही आपल्या पारदर्शक आणि प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितले.

**विकसित भारतासाठी योगदान द्या – राज्यपाल जिष्णू देव वर्मा**

भारतीय महसूल सेवेत महिला अधिकाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे हे अनंददायी चित्र असल्याचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले. भारताची आज जगाच्या नेतृत्वाकडे वाटचाल सुरू आहे. अशा काळात राष्ट्राच्या उभारणीत सहभागी होण्याची संधी तुम्हाला मिळाली आहे. तिचा योग्य उपयोग करा, असे आवाहन राज्यपालांनी अधिकाऱ्यांना केले.

**व्यापक जनहिताला डोळ्यापुढे ठेवणे आवश्यक – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

सरकारी अधिकारी म्हणून निर्णय घेताना व्यापक जनहिताला डोळ्यापुढे ठेवणे आवश्यक असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताच्या संकल्पात भारतीय महसूल सेवा विभाग व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित महत्त्वाची असल्याचे राज्याचे महसुलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

भारत झपाट्याने प्रगती साध्य करत आहे. जगात स्वतःची एक भक्कम ओळख आता आपली निर्माण झाली आहे. अशा काळात आपल्या सेवेला तुम्ही सुरुवात करत आहात. प्रगतीच्या परिवर्तनात केंद्रस्थानी आपली अर्थव्यवस्था असून त्या अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणात आपली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. या गतिशील वातावरणात कर व्यवस्थेची भूमिका अतिशय महत्त्वाची असल्याचे महसूलमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले.

प्रारंभी दीप प्रज्वलानंतर राष्ट्रपती तसेच अन्य पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष रवी अग्रवाल यांनी प्रास्ताविकात प्रशिक्षणाविषयी माहिती दिली. ७८ व्या तुकडीतील गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचा प्रारंभ तसेच सांगता वंदेमातरम आणि राष्ट्रगीताने झाली.

## श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**रिसोड(प्रतिनिधी)/रणजितसिहं ठाकूर :** भारतीय संविधानाचे जनक भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दिनांक 14 एप्रिल 2026 रोजी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे उत्साहात साजरी करण्यात आली.याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख हे होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य संजय नरवाडे, जेष्ठ प्राध्यापक अरुण लिमजे,ज्येष्ठ शिक्षिका शोभा राऊत ह्या होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य संजय देशमुख व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला, त्यानंतर उपस्थित




सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका तथा शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.यावेळी बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना मानवी जीवनाचा उद्धार हा केवळ शिक्षणाने होऊ शकतो, शिक्षण मानवाला चांगले आणि वाईट यातील फरक समजण्यासाठी सक्षम बनविते, त्यामुळे समाजाचा उद्धार हा शिक्षणाने होऊ शकतो ही गोष्ट डॉक्टर बाबासाहेबांनी जाणली होती आणि म्हणूनच बाबासाहेब म्हणायचे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे व ते प्राशन केल्यानंतर प्रत्येक जण गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, शिका संघटित व्हा व संघर्ष करा ही बाबासाहेबांची शिकवण अत्यंत महत्त्वाची आहे, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षणाने त्या परिस्थितीवर मात करता येते हे बाबासाहेबांनी सर्वांना दाखवून दिले.

भारतीय राज्यघटना सर्वांना समतेची शिकवण देते, असेही त्यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक विजय देशमुख यांनी केले.

## अडोळी शाळेत भारतरत्न डॉ.बाबासाहेबांना अभिवादन; विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** अडोळी वाशीम तालुक्यातील अडोळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त उत्साहात भीमजयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बहुजन रत्न पुरस्कार प्राप्त राजकुमार पडघान उपस्थित होते. तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बंडू पडघान व के. डी. जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात




राजकुमार पडघान यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी अथक परिश्रमातून समाजातील वंचित घटकांना अंधारातून प्रकाशाकडे नेले आणि माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला. संविधानाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करून प्रत्येकाला समान हक्क व अधिकार दिले. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करून समाज परिवर्तनाचा भक्कम पाया रचला. त्यामुळे प्रत्येकाने शिक्षणाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भागवत मोहीरे यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षक गणेश जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षक गजानन इढोळे यांनी मानले.

यावेळी शिक्षक वृंद संजय नाईकवाडे, विश्वनाथ इढोळे, गोरखनाथ ठोंबरे, दिपाली कापसे, सोनाली दिवटे, मंगला आसोले, उषा कव्हर यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित निबंध व विचारांचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षवेधी ठरला.

## अतिशय क्षेत्र मौजे जुनी येथे पंचस्तिकाय ग्रंथाचे विमोचन संपन्न

**दैनिक युवक आधार :**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी तालुक्या शेजारील मौजे जुन्नी येथील १००८ विघ्नहर पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिराच्या प्रथम वर्धापन दिना निमित्त तीर्थरक्षा शिरोमणी आ.श्री १०८ आर्यनंदी मुनी महाराज यांचे हस्तलिखित "पंचस्तिकाय " या ग्रंथाचे विमोचन आज अतिशय क्षेत्र जुन्नी जि.नांदेड येथे संपन्न झाले.

या सोहळ्यास उपस्थित माजी आमदार श्री.ओमप्रकाश पोकर्णा, प्रकाशचंद सेठी,




कैलासचंद काला, पारसमल दर्डा, महावीर वायकोस, महावीर लोहांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच उमरी व धर्माबाद येथील जवळपास ४०० श्रावक - श्रविका उपस्थित होते.

## नागपूर जिल्ह्यात २३२० रुग्णांना सुमारे १९ .७९ कोटींची मदत ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव /वाडी नागपूर :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. नागपूर जिल्ह्यात आर्थिक वर्षात २३२० रुग्णांना सुमारे १९ कोटी ७९ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत-**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसाहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत नागपूर जिल्ह्यातील २३२० रुग्णांना सुमारे १९ कोटी ७९ लाख ५६ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदीमुळे रूग्णांना वेळेत अर्थसाहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांना केले आहे.

## भीमजयंतीनिमित्त वाशिममध्ये राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुपचा सेवाभाव; मान्यवरांचा सत्कार व भव्य पाणीवाटप

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वाशिम शहरात सामाजिक ऐक्य, सेवा आणि आदराची भावना अधोरेखित करणारा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे येणाऱ्या भव्य मिरवणुकीचे स्वागत करत राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुपच्या वतीने भीमजयंती




मंडळाचे अध्यक्ष व मान्यवरांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी मिरवणुकीत सहभागी झालेल्या हजारो समाजबांधव व नागरिकांना उन्हाच्या तीव्रतेचा विचार करून थंड पाण्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गिरधारीलाल सारडा, मोहन नखाते, डॉ. सिद्धार्थ देवळे, बांधकाम सभापती राहुल तुपसांडे, आशिष इंगोले, राम ठेंगडे, संजय डवरे, कृणाल डबले, दिलीप भेंडेकर, दीपक ढगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते मंडळाच्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करण्यात आले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय मोतीवार, प्रतीक कांबळे, भूषण देशपांडे, संध्याताई सभादिंडे, ओमप्रकाश फड, अमोल भेंडेकर, मंगेश वानखेडे, हरीश सभादिंडे, उबेर पठाण, किसनराव धोटे आदी कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.भीमजयंतीच्या पावन निमित्ताने राबविण्यात आलेल्या या सेवाभावी उपक्रमामुळे सामाजिक एकात्मता दृढ होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## मृत महिलेची ओळख पटवण्याचे पनवेल तालुका पोलिसांसमोर आव्हान

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल : वार्ताहर :** 20 ते 25 वर्षीय महिलेची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने ज्वलनशील पदार्थाने तिचा मृतदेह जाळून टाकल्या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात विरोधात अज्ञाता विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या महिलेची ओळख पटवण्याचे आव्हान पनवेल तालुका पोलीसांसमोर आहे. 11 एप्रिल रोजी चिंचवली आणि वाकडी गावचे सीमेजवळ वनविभागाच्या जागेतील

मयताचे नाकातील नथ



झुडपामध्ये एका वीस ते पंचवीस वर्षीय अनोळखी महिलेचा मृतदेह जळालेल्या अवस्थेत पनवेल तालुका पोलिसांना सापडून आला आहे. त्या महिलेच्या उजव्या कानात सफेद धातूचा टॉप्स, डाव्या हातातील मधल्या बोटात सफेद धातूची अंगठी, नाकात सफेद धातूची नथ त्यावर बारीक खडे आहेत. तिच्या दोन्ही हाताच्या मनगटावर लाल पिवळा धागा बांधलेला आहे. दोन्ही पायाच्या अंगठ्याच्या नखाला लालसर नेलपॉलिश लावलेले आहेत. या महिलेची ओळख पटवण्याचे काम सुरू असून या महिलेबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल तालुका पोलिसांची संपर्क साधावा.

# संत शिरोमणी गोरोबाकाका कुंभार यांच्या ७०९व्या पुण्यतिथीनिमित्त वांगी बुद्रुक येथे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड:-** तालुक्यातील वांगी बुद्रुक येथे कुंभार समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी गोरोबाकाका कुंभार यांची ७०९ वी पुण्यतिथी अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. कुंभार समाज तालुकाध्यक्ष योगेश पवार व समस्त समाज बांधवांच्या वतीने या विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी गोरोबाकाका कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी 'संत गोरोबाकाका कुंभार महाराज की जय' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. समाजातील एकता आणि संतांचे विचार जोपासण्याच्या उद्देशाने हा सोहळा संपन्न झाला.

याप्रसंगी माजी सरपंच बापू काकडे, सरपंच बाळू साळवे, ग्रामरोजगार सेवक सुरेश साळवे, आबा साळवे, विजय साळवे, संतोष काकडे, संदीप काकडे, गणेश शिंदे, मंगेश पवार, सचिन साळवे, विलास दांडगे, तातेराव जाधव यांच्यासह गावातील प्रतिष्ठीत नागरिक, कुंभार समाज बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

# डॉ .बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त संविधान कट्टावर वारली चित्राची सजावट

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पनवेल येथील संविधान कट्टा येथे विशेष वारली चित्रांच्या माध्यमातून सजावट करण्यात आली. लोकांच्या हातात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधानिक मूल्ये असल्याने या वारली चित्रांद्वारे या मूल्यांचे कलात्मक सादरीकरण करण्यात आले आहे. हे चित्र चित्रकार उत्तम घोष यांनी साकारले आहे.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "संवैधानिक नैतिकता ही नैसर्गिक भावना नसून ती शिकवून घ्यावी लागते" या विचारावर आधारित हे चित्र लोकशाहीतील सहभाग, जागृकता आणि एकजुटीचा संदेश देते. लोक एकत्र येऊन संविधान समजून घेत आहेत आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पुढे येत आहेत, असे दर्शन या चित्रातून घडते, अशी माहिती चित्रकार उत्तम घोष यांनी दिली.

या उपक्रमाबद्दल बोलताना रविना कांबळे आणि प्रविण जठार यांनी सांगितले की, "आम्ही बाबासाहेब आंबेडकर जयंती आगळ्या-वेगळ्या पद्धतीने साजरी करत आहोत. या वारली चित्राद्वारे आम्ही संविधानाच्या मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा प्रयत्न करीत आहोत."

# ग्राहकांची पहिली पसंती ठरत आहे थ्री स्टार राज रिसॉर्ट

## दिवंगत राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांचे खानसामा राज रिसॉर्ट येथे रुजू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल , ( वार्ताहर ) :** पनवेल तालुका परिक्षेत्रातील राज रिसॉर्ट हे पहिले थ्री स्टार रिसॉर्ट ठरले आहे. माजी नगरसेवक संतोष उरणकर संचलित या रिसॉर्टने अल्पावधीतच देशी आणि परदेशी ग्राहकांच्या मनात घर गेले आहे. मॅरेज लॉन, अद्ययावत पविका रेस्टॉरंट, स्विमिंग पूल, वातानुकूलित बँक्वेट हॉल, आणि प्रशस्त रूम्स असणाऱ्या राज रिसॉर्ट हे परफेक्ट व्हेकेशन स्पॉट आणि मॅरेज डेस्टिनेशन ठरत आहे.

राज रिसॉर्ट हे पनवेल तालुक्यातील उसर्ली बुद्रुक या गावी निसर्गाच्या कुशीत वसलेले आहे. नैसर्गिक हिरवळी सोबतच संतोष उरणकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या गार्डन टीमने येथे देशी आणि विदेशी झाडांचा समन्वय साधत वृक्ष राजी फुलवली आहे. ग्राहकांची सोय सुविधा यांचा अत्यंत काटेकोरपणाने



अभ्यास करून लिफ्ट, लॉन, स्टेज, फूड एरिया यांचे नियोजन या रिसॉर्ट वर करण्यात आले आहे. फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, इटली येथील पर्यटकांनी राज रिसॉर्टच्या पाहुणचाराचा आस्वाद घेऊन त्यांची प्रशंसा केलेली आहे. राज रिसॉर्ट मध्ये उत्तम दर्जाचे पविका रेस्टॉरंट कार्यान्वित करण्यात आलेले असून गरमागरम आणि ताजे सकस खाद्यपदार्थ येथे शिजवले जातात. विशेष उल्लेखनीय म्हणजे या रिसॉर्टचे शेफ मनोज पाटील यांनी तब्बल नऊ वर्षे माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांचे खानसामा म्हणून काम केलेले आहे. एपीजे अब्दुल कलाम डी आर डी ओ येथे असताना शेफ मनोज पाटील त्यांच्यासाठी जेवण बनवायचे. मूळचे अलिबाग तालुक्यातील असणारे मनोज पाटील यांच्या हाताला अप्रतिम चव असून एकदा त्यांच्या हातचे जेवलेली व्यक्ती त्यांची आठवण संपूर्ण आयुष्यभर जपून ठेवते. ढाबा कल्चर आणि चायनीज ठेल्यांची रेलचेल असणाऱ्या पनवेल तालुका ग्रामीण विभागात सर्व परवाने आणि परवानग्या घेऊन शंभर टक्के अधिकृत रिसॉर्ट या ठिकाणी चालविण्यात येते. त्यामुळे या रिसॉर्टवरती व्हेकेशन अथवा कौटुंबिक कार्यक्रमाचा आस्वाद घेताना सर्व गोष्टी लीगल असल्यामुळे ग्राहक निर्धोकपणे येथे आपापले कार्यक्रम एन्जॉय करतात. निवासासाठी निर्माण केलेल्या खोल्यांच्यातील फर्निचर आणि अंतर्गत सजावट स्वतः मालक संतोष उरणकर यांच्या संकल्पनेतून करण्यात आलेली आहे. येथे वास्तव्य करणाऱ्या ग्राहकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की भरपूर सूर्यप्रकाश, खेळणारी हवा आणि खिडकीतून बाहेर डोकावले असता दिसणारा अमर्याद निसर्ग यामुळे येथे पुन्हा पुन्हा यावेसे वाटते.टापटीप स्वच्छता, मुबलक पार्किंग या राज रिसॉर्टच्या जमेच्या बाजू आहेत. टेबल टेनिस, बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम अशा खेळाचा आस्वाद ग्राहक या ठिकाणी घेऊ शकतात. हल्ली फार प्रचलित असणारी आणि ग्राहकांना "बिन मोसम बरसात चा" आनंद मिळवून देणारी रेन डान्स फॅसिलिटी देखील येथे उपलब्ध आहे.केवळ भोजनाचा अथवा मद्यपानाचा आस्वाद घेण्यासाठी येणाऱ्या ग्राहकांच्या सेवेमध्ये येथील डेडिकेटेड पविका रेस्टॉरंट अँड बार सदैव तैनात असतो. स्पा आणि मसाज ही सशुल्क सेवा देखील येथे उपलब्ध आहे. ग्राहकांना हवा असलेला मेन्यू, हिरवीगार लॉन, पुल साइड डायनिंग व्यवस्था, सुग्रास जेवण आणि राहण्यासाठी भरपूर रूम्स यामुळे डेस्टिनेशन वेडिंग साठी राज रिसॉर्ट ही पहिली पसंती बनत आहे. राज रिसॉर्ट येथे कार्यक्रमाचे आयोजन करायचे असल्यास वाचकांनी 9819344222 या क्रमांकावर संपर्क साधावा.

शेडूंग टोल नाक्यापासून ते थेट चिंध्रण, वावंजे या ग्रामीण विभागीय पट्ट्यात अधिकृत रेस्टॉरंट किंवा बार नाहीत. थ्री स्टार राज रिसॉर्ट हा एकमेव पर्याय ग्राहकांसाठी सेवा प्रदान करत आहे. आज राज रिसॉर्ट हे एक लँड मार्क बनले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त सीकेटी विद्यालयात संस्थांतर्गत शिक्षकांच्या रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात संस्थेचेचेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या अमृतमहोत्सवानिमित्त आज (दि.१६) उच्च माध्यमिक विभागातर्फे संस्थांतर्गत शिक्षकांच्या रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत यांच्या हस्ते रस्सीखेच स्पर्धेचे उद्घाटन झाले. तसेच त्यांच्या हस्ते क्रीडा ध्वज फडकविण्यात आला. संस्था सदस्य राहुल घरत यांनी सर्व सहभागीसंघांना शुभेच्छा दिल्या तसेच याप्रसंगी प्रास्ताविक करताना प्राचार्य प्रशांत मोरे यांनी स्पर्धेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट करून सर्व सहभागी संघांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक




विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण,इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, कैलास म्हात्रे, स्वाती पाटील आदी विभाग प्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धेत संस्थेतील आठ शाखांमधून एकूण १३ संघांनी सहभाग घेतला.या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पुरुष शिक्षकांच्या एकूण ६ संघांनी तर महिला शिक्षकांच्या ७ संघांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील सहभागी पुरुष शिक्षकांच्या संघातून रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघर या संघाने प्रथम क्रमांक(रोख रक्कम रु. पाच हजार), चांगु काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय (ज्युनिअर कॉलेज) नवीन पनवेल या संघाने द्वितीय क्रमांक(रोख रक्कम रुपये तीन हजार) तर चांगु काना ठाकूर आर्ट्स,सायन्स अँड कॉमर्स सीनिअर कॉलेज खांदा कॉलनी या संघाने तृतीय क्रमांक(रोख रक्कम रु.दोन हजार)पटकावला.

तसेच या स्पर्धेतील सहभागी महिला शिक्षकांच्या संघातून श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालय द्रोणागिरी या संघाने प्रथम क्रमांक(रोख रक्कम रु. पाच हजार ), मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि टी एन घरत ज्युनिअर कॉलेज गव्हाण या संघाने द्वितीय क्रमांक(रोख रक्कम रुपये तीन हजार) तर चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय(ज्युनिअर कॉलेज) नवीन पनवेल या संघाने तृतीय क्रमांक(रोख रक्कम रु.दोन हजार)पटकावला. संस्थेचे सदस्य राहुल घरत यांच्या हस्ते सर्व विजेत्या संघाचा रोख बक्षीस रक्कम, आकर्षक ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन सन्मान करण्यात आला. तसेच या स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ क्रीडाशिक्षक अरुण पाटील तसेच मनोज पाटील, माधवी कोळी, रामहरी मस्के, मनोहर महाजन, तृप्ती जोशी, दीप्ती वालम, अमृता देशमुख यांनी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले.विज्ञान विभाग सहशिक्षिका अपर्णा मुकणे, तसेच वाणिज्य विभाग सहशिक्षिका योगिता जोरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विज्ञान विभाग सहशिक्षिका तृप्ती जोशी यांनी स्पर्धेचे व्हिडिओ चित्रण केले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवर, सर्व विद्यार्थी स्पर्धक, शिक्षक, क्रीडा समिती सदस्य, परीक्षक यांचे आभार व्यक्त करून सर्वांच्या संयुक्त सहकार्याने या स्पर्धेचे यशस्वी आयोजन झाले.

# सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त कार्याचा गौरव देवणी शहर कॉंग्रेस मात्र दुर्लक्षाची खंत

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिध/ पांडुरंग कदम :** लातूर जिल्ह्याचे सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते व माजी अर्थ व नियोजन राज्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे लहान बंधू म्हणून ओळख असलेल्या दिलीपराव देशमुख यांनी सहकार, पुनर्वसन, क्रीडा व युवा कल्याण या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक लोकहिताचे निर्णय घेण्यात आले असून ते "सहकार महर्षी" म्हणून महाराष्ट्रात परिचित आहेत.

सन २००० ते २०१८ या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी प्रभावी भूमिका बजावली. तसेच माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या



नेतृत्वाखाली मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. राजकारणात येण्यापूर्वीही सहकार क्षेत्रात त्यांनी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली होती.दरम्यान, लातूर जिल्ह्यातील दहा तालुके पैकी नऊ तालुक्यात देवणी वगळता इतर तालुक्यांमध्ये त्यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी शिबिरे, मोतीबिंदू ऑपरेशन, मोफत चष्मे वाटप असे समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. मात्र, जिल्ह्यातील देवणी शहरात अशा प्रकारचे कोणतेही कार्यक्रम आयोजित न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.देवणी तालुका नगरपंचायतीच्या २०२२ च्या निवडणुकीत माजी पालकमंत्री अमितजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली १७ पैकी १४ नगरसेवक कॉंग्रेस आघाडीचे निवडून देत नागरिकांनी देशमुख परिवारावर विश्वास दाखवला होता. तरीही वाढदिवसासारख्या महत्त्वाच्या दिवशी देवणी शहर नगरपंचायत कडून कोणतेही कार्यक्रम न होणे, ही बाब स्थानिकांसाठी खंत व्यक्त करणारी ठरत आहे. देवणी कॉंग्रेसला देशमुख परिवारांचा विसर पडल्याचे दिसते आहे 18 एप्रिल रोजी वाढदिवस येत आहे.

नागरिकांच्या अपेक्षेनुसार, येणाऱ्या काळात देवणी शहरातील कॉंग्रेस नगराध्यक्ष नगरसेवकाने समान लक्ष देऊन समाजोपयोगी उपक्रम राबवावेत, अशी मागणी होत आहे.

# आनंद दत्तधान आश्रम श्रीक्षेत्र माहुरगड अधिक मासानिमित्त भव्य अन्नदान व दत्त नामस्मरण सोहळास उपस्थित रहावे

## स्वच्छता ब्रॅण्ड अँबेसिडर सदगुरू साईनाथ महाराज बितनाळकर ऊर्फ वसमतकर

**दैनिक युवक आधार :**

**उमरी वार्ताहर /रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** उमरी तालुक्यातील संताच्या भूमित जन्मलेले महाराष्ट्रात स्वच्छता ब्रॅण्ड अँबेसिडर सध्या प्रसिद्ध झालेले राष्ट्रसंत सदगुरू साईनाथ महाराज बितनाळकर ऊर्फ वसमतकर यांच्या श्रीक्षेत्र माहुर गडावरील आश्रमात अधिक मास (धोंड्याचा महिना) पुरुषोत्तम मासानिमित्त १७ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत भव्य अन्नदान व दत्त नामस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात सर्व जनतेस व नागरिकास निमंत्रण देण्यासाठी ते उमरी तालुक्यात आले असता उमरी नगरपरिषद येथे पत्रकार परिषद घेण्यात आली.

गोरठा येथिल संतदासगणू महाराज यांच्या गावी कांही काळ सदगरु साईनाथ महाराज यांचे वडिल वास्तव्यात होते याच पावन पवित्र भूमित तालुक्यातील बितनाळ



येथिल संत म्हणून साईनाथ महाराज हे दुसरे संत म्हणून उदयास आले आहेत त्यांचा दत्तनामाचे नामस्मण अन्नदान जोड हे श्रीक्षेत्र माहूर गडात अग्रेसर आहे त्यांच्या विविध सामाजिक उपक्रमाची दखल घेवून शासनाने महाराष्ट्राचे स्वच्छता दूत ब्रॅण्ड अँबेसिडर म्हणून निवड केली आहे. शासकीय आयटीआय प्रमुख मार्गदर्शक, परमपूज्य श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा आध्यात्मिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम पार पडणार आहे.

श्री साईनाथ महाराज वसमतकर हे समाजप्रबोधन, स्वच्छता, अन्नदान व अध्यात्म क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या दशसूत्री कार्यक्रमातून राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये नित्य अन्नदान, शिवनेरी किल्ल्यावर दत्त नामस्मरण, अटारी बॉर्डर येथे दत्त नामाचा गजर, तसेच गिरनार पर्वतावर सात दिवसांचा सप्ताह व नामस्मरण यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, बुवाबाजीविरोधी जनजागृती, शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रातही ते सातत्याने कार्यरत आहेत.

या उपक्रमासाठी माहूर तालुक्यातील भाविक, नागरिक व पत्रकार बांधवांना चुलबंद आमंत्रण देण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्याची सुरुवात १७ मे रोजी भव्य अन्नदानाच्या पहिल्या पंगतीने होणार असून, ही सेवा उमरी तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, उमरी उपनराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर व समस्त गोरठेकर परिवार आणि गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात येणार आहे.

अखंड अन्नदान महायज्ञाचा समारोप १५ जून रोजी श्री साईनाथ महाराज वसमतकर यांचे जन्मगाव बितनाळ येथील भाविकांच्या वतीने करण्यात येणार आहे. या कालावधीत दररोज दत्त नामस्मरण, भजन, कीर्तन, प्रवचन, अन्नदान तसेच समाजप्रबोधनपर विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

याच पार्श्वभूमीवर श्री साईनाथ महाराज वसमतकर यांच्या दशसूत्री कार्यक्राची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे सामाजिक, आध्यात्मिक व जनजागृतीसंदर्भातील विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तरी उमरी तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील सर्व पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, भाविक भक्त व नागरिकांनी या पवित्र सोहळ्यास आनंद दत्तधान आश्श्रस श्रीक्षेत्र माहुरगड येथे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेस उपस्थित देविदास आकमवाड (बितनाळ उपसरपंच), शंकर मॅकलवाड, प्रमोद आप्पलवाड, भुजंग ढंगे ,रामजी गोडगे , मारोतराव मनुरकर , पै.गोविंद बकेवाड,लक्ष्मन वाघमारे व सर्व पत्रकार बांधव यावेळी उपस्थित होते.

# सीबीएसईचा दहावीचा निकाल जाहीर; यंदाही मुलींची बाजी

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा दहावीच्या परीक्षेचा निकाल बुधवारी जाहीर करण्यात आला. या वर्षी सीबीएसईचा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल ९३.६६ टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे.बोर्डाने यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत १ महिना अगोदर जाहीर केला आहे.सीबीएससीची बोर्डाची परीक्षा १७ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत घेण्यात आली होती. एकूण २४,७१,७७७ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यामध्ये २३,१६,००८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.दरवर्षीप्रमाणे यंदादेखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. मुलांच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक आहे. सीबीएसईने अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही.

**NOTICE**

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO : 2026_DOAWB_1295100**

***(Fully Automatic Cleaning and Grading Unit - 4 TPH)***

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. ***Grogreen Agronomics Producer Co. Ltd., Malegaon, Tq - Malegaon, Dist – Washim*** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in *tender and procurement section*. The last date for submission of online bid is **27/04/2026 up to 14.00 PM**. Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project PROJECT DIRECTOR ATMA OFFICE At Behind collector office administrative building, R A College Road WASHIM, Washim, 444505**

# महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : आयएसओ नामांकन व नीती आयोग नोंदणीकृत एनजिओ महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्ट दर्यापूरच्या वतीने स्थानिक ढोकणे सभागृहात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व हारार्पण करून करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विश्वस्त, निवृत्त मुख्याध्यापक व जेष्ठ मार्गदर्शक मारोतराव काळे गुरुजी उपस्थित होते.

**मान्यवरांची उपस्थिती व विचारमंथन**

प्रमुख अतिथी म्हणून निवृत्त तालुका कृषी अधिकारी राजकुमार अडगोकर, प्रबोधन कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य दत्तात्रय रेवस्कर, ज्येष्ठ विश्वस्त श्रीधर पवार व गजानन मेहरे हे मंचावर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. दलित, शोषित वंचित घटकांच्या उद्धारासाठी त्यांनी केलेला संघर्ष, शिक्षणाचे महत्त्व आणि



संविधान निर्मितीतील त्यांचे योगदान यावर वक्त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात मारोतराव काळे गुरुजी म्हणाले की बाबासाहेबांचे विचार हा आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपाचे जिल्हा सचिव व ट्रस्टचे महासचिव रवींद्र ढोकणे यांनी केले. प्रास्ताविक संजय गणोरकर यांनी मांडले तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन राजकुमार गिन्हे यांनी केले.

या जयंती कार्यक्रमाला ट्रस्टचे पदाधिकारी, सभासद, सामाजिक कार्यकर्ते तसेच दर्यापूर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ट्रस्टच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# महामानवाचा वारसा जपत श्रावणीच्या स्मृतींना उजाळा; महागाव येथे 'पाणपोई'चा लोकार्पण सोहळा

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव/ (यवतमाळ )** : प्रतिनिधी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा दिव्य संदेश देणारे भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून महागाव येथे एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्व. कु. श्रावणी निलेश नरवाडे हिच्या स्मृतीप्रित्यर्थ, प्रवासी आणि नागरिकांची तहान भागवण्यासाठी भव्य 'पाणपोई'चा शुभारंभ मंगळवार, १४ एप्रिल रोजी करण्यात आला.

संविधान आणि मानवता यांचा संगम

१४ एप्रिल १९४८ रोजी डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची शिकवण देणारे संविधान बहाल करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान केली होती. 'पाणी' हा




मानवाचा मूलभूत हक्क आहे, हे चवदार तळ्याच्या सत्याग्रहातून बाबासाहेबांनी जगाला दाखवून दिले. तोच सामाजिक वारसा जपत, रणरणत्या उन्हात प्रवाशांची सोय व्हावी या उदात्त हेतूने ही पाणपोई सुरू करण्यात आली आहे.

शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक ऋण

डॉ . बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षणासाठी आणि वंचितांच्या उत्थानासाठी वेचले. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे," हे त्यांचे वाक्य आजही प्रेरणा देते. स्व. श्रावणीच्या आठवणींना उजाळा देतानाच, समाजाप्रती असलेले आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी विजय खंदारे यांच्या सौजन्याने हा उपक्रम राबवण्यात आला आहे. महागाव बस स्थानक परिसरात प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेता, 'शुभम सर्विसिंग सेंटर' जवळील हा 'ट्रॅव्हल्स पॉईंट' आता तहानलेल्यांसाठी विसावा ठरणार आहे.

**कार्यक्रमाचा तपशील:**

प्रसंग: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व स्व. कु. श्रावणी निलेश नरवाडे स्मृती प्रित्यर्थ पाणपोई उद्घाटन.

महागाव बस स्थानकाजवळ, ट्रॅव्हल्स पॉईंट, शुभम सर्विसिंग सेंटर, महागाव.

दि. १४ एप्रिल २०२६.

सौजन्य: विजय खंदारे.

"माणुसकीच्या नात्याने समाजासाठी केलेले छोटेसे कार्य हेच खऱ्या अर्थाने महामानवाला अभिवादन ठरते. श्रावणीच्या स्मृती या उपक्रमाच्या माध्यमातून सदैव जनसेवेत जिवंत राहतील.

# रांजणी येथील उर्दू शाळेत भीमजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**घनसावंगी-जालना(एकनाथ जाधव) :** घनसावंगी तालुक्यातील रांजणी जिल्हापरिषद उर्दू प्राथमिक शाळेत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या135 व्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने सकाळी ठीक 10 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख इरफान तांबोळी, जिल्हा परिषद उर्दू शाळेचे मुख्याध्यापक इलियास पठाण व एकीची भावना राखणारे सामाजिक कार्यकर्ते रमण जाधव यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात



आली.यावेळी माजी पत्रकार श्रीमंत मगर, अशोक पाटोळे, भारत जाधव, बी.एल. ओ.पाटोळे सर, माजीद सिद्दीकी, महेंद्र उबाळे, प्रदीप जाधव, सुनिल जाधव तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# संत गोरोबाकाका पुण्यतिथीनिमित्त गालसुरे कुंभार समाजाचा भक्तीमय सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : संत गोरोबाकाका यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत गालसुरे कुंभार समाजाच्या वतीने आज भक्तीभावाने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पालखी सोहळा, पूजन व महाप्रसाद यांचा समावेश होता.

सकाळी संत गोरोबाकाका यांच्या प्रतिमेची विधिवत पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात



आली. त्यानंतर गावातून भक्तिमय वातावरणात पालखी मिरवणूक काढण्यात आली. "गोरोबाकाका महाराज की जय" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. समाजातील सर्व वयोगटातील नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले.

कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे समाजात एकोप्याची भावना वृद्धिंगत होऊन संत परंपरेचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचला.

गालसुरे कुंभार समाजाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समाजातील ऐक्य अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# येणारी जनगणना बौद्धांसाठी निर्णायक – ॲड. किशोर गजभिये यांचे मत

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका : नागपूर (प्रतिनिधी)** : दी स्कूल ऑफ नोबल थॉट तर्फे चालविण्यात येणाऱ्या पॉलिटिकल स्कूल अंतर्गत "राष्ट्रीय जनगणना आणि आंबेडकराईट बौद्धांची भूमिका" या विषयावर १२ एप्रिल २०२६ रोजी चारिका बुद्ध विहार, शिल्पा सोसायटी, नागपूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून आयुष्यमान ॲड. किशोर गजभिये (आयएएस, निवृत्त प्रधान सचिव, सामाजिक न्याय मंत्रालय, महाराष्ट्र शासन) उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, अनुसूचित जातींच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात निधी दिला जातो. तसेच नोकरीतील




आरक्षणासाठीही अनुसूचित जाती हा निकष महत्त्वाचा आहे. त्यामुळे येणाऱ्या जनगणनेत अनुसूचित जातींची अचूक लोकसंख्या निश्चित होणे अत्यावश्यक आहे.

त्यांनी आवाहन केले की, जनगणनेच्या नमुना फॉर्ममध्ये जातीच्या रकान्यात बौद्धांनी आपली मूळ अनुसूचित जात नोंदवावी, तर धर्माच्या रकान्यात "बौद्ध" अशी नोंद करावी. यामुळे देश व राज्यातील बौद्धांची अचूक लोकसंख्या निश्चित होऊन त्यानुसार लोकसभा-विधानसभा जागा व आरक्षणाचे प्रमाण कायम राहण्यास मदत होईल. तसेच १९९० मध्ये व्ही. पी. सिंग यांच्या काळातील संविधानिक अधिसूचनेनुसार बौद्ध धर्म स्वीकारलेल्या अनुसूचित जातींना सर्व हक्क मिळतात, याबाबत जनजागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दी स्कूल ऑफ नोबल थॉटचे संचालक डॉ. एन. व्ही. ढोके होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी साउथबरो कमिशन, पुणे करार, १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कायदा, तसेच संविधानातील कलम ३३५ पर्यंत अनुसूचित जातींना आरक्षण मिळवून देण्यासाठी केलेल्या संघर्षाचा उल्लेख केला. हे आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी आणि बौद्धांची लोकसंख्या वाढवण्यासाठी जनगणनेत योग्य नोंद करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच अनुसूचित जातीतील लोकांचे बौद्ध धर्मात धर्मांतर वाढवण्यासाठी संघटित आणि नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. बी. पी. नारनवरे यांनी केले. या कार्यक्रमाला परिसरातील सर्व जाती-धर्मातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, पिरकोन. येथे 'जिज्ञासा मॅथ्स लॅब' उपक्रमांतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पनवेल( DITE). च्या अधिव्याख्यात्यांची विद्यालयाला भेट

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DITE) पनवेल, रायगड येथील ज्येष्ठ अधिव्याख्याते

इनामदार साहेब व कामशेट्टी साहेब यांनी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयास भेट दिली. Jidnyasa Max Lab या उपक्रमाअंतर्गत आयोजित या भेटीत त्यांनी शाळेतील STEM Lab ची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी या उपक्रमाचे आयोजक रणजीत सर देखील उपस्थित होते. पाहुण्यांनी प्रयोगशाळेतील विविध साहित्य, उपकरणे व विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रकल्प यांची माहिती घेत समाधान व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधत विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. A. A.





पाटील मॅडम, ज्येष्ठ शिक्षक पी. एम. पाटील सर, म्हात्रे सर, डाढाळे सर व इतर शिक्षकवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीस ज्येष्ठ शिक्षिका सौ. एम. एस. पाटील मॅडम यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.या भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रयोगाधारित विज्ञानधिष्टित शिक्षणाची प्रेरणा मिळाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय

---

**जाहीर प्रसिध्दकरण**

जा.क्र. फौज/कावि/७८७/२०२५
दिनांक- २७-०३-२०२६

१) अस्लम हसन शेख
रा. सणसर ता. इंदापूर जि. पुणे } अर्जदार

**विरुध्द**

१) ग्रामसेवक/निबंधक
सणसर ता. इंदापूर जि.पुणे } सामनेवाला

**विषयः-जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२) (३) प्रमाणे अर्ज**

ज्याअर्थी, यातील अर्जदार अस्लम हसन शेख हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार अस्लम हसन शेख यांचा जन्म दिनांक ०१-०६-१९८५ रोजी मौजे सणसर ता. इंदापूर जि. पुणे येथील अर्जदार यांच्या राहत्या घरी/दवाखान्यात झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म रजिस्टरला नोंद नसल्यामुळे त्यांनी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख २७-०४-२०२६ रोजीपर्यंत स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक-२७-०३-२०२६ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे

**उपविभागीय अधिकारी**
**तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती**

कोर्टाचा शिक्का

**ठिकाणः-बारामती**
**दिनांकः- २७-०३-२०२६**

## जाहीर नोटिस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. MH/46/4980B2016 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH46AC2527 चे मालक कै.संजय बाळकृष्ण पाटील याचं दिनांक 29-01-2025 रोजी निधन झाले आहे.

**मी**
**सुनीता संजय पाटील**
**फ्लॅट न -202,ओम हिरा अपार्टमेंट,**
**लाईन अली शिवाजी रोड ता-पनवेल, रायगड, महाराष्ट्र, -410206.**

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/ प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे. याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**सुनीता संजय पाटील**
**फ्लॅट न -202,ओम हिरा अपार्टमेंट,**
**लाईन अली शिवाजी रोड , ता-पनवेल,**
**रायगड,महाराष्ट्र,410206.**

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पनवेलमध्ये ‘नारीशक्ती वंदन अधिनियम’ समर्थनार्थ भव्य पदयात्रा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : भारतीय लोकशाहीतील ऐतिहासिक आणि परिवर्तनकारी टप्पा मानल्या जाणाऱ्या ‘नारीशक्ती वंदन अधिनियम’ या कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी व जनसमर्थन मिळविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्यावतीने आज (गुरुवारी) पनवेल शहरात भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम यांच्या नेतृत्वाखाली ही पदयात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. या पदयात्रेत पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी महापौर कविता




चौतमोल, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, रमेश मुंढे, प्रल्हाद केणी, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने महिला आणि नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

पदयात्रेची सुरुवात पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयापासून करण्यात आली. त्यानंतर बाजारपेठ मार्गे जात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून पुढे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत ही पदयात्रा पुढे सरकत ठिकठिकाणी जनजागृती करण्यात आली. संपूर्ण पदयात्रेदरम्यान घोषणाबाजी, फलक आणि बॅनरच्या माध्यमातून ‘नारीशक्ती वंदन अधिनियम’चे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आले. यावेळी या कायद्याच्या समर्थनार्थ स्वाक्षरी मोहीमही राबविण्यात आली, ज्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या प्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या मनोगतातून या अधिनियमाचे महत्त्व अधोरेखित केले. लोकसभा व राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा हा कायदा महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक क्रांतिकारी पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले. या निर्णयामुळे धोरणनिर्मितीत महिलांचा सहभाग वाढून देशाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ‘नारीशक्ती वंदन अधिनियम’ हा केवळ आरक्षणाचा कायदा नसून महिलांच्या सन्मानाचे आणि समान हक्कांचे प्रतीक आहे. या माध्यमातून सामान्य कुटुंबातील कर्तृत्ववान महिलांना राजकारणात येण्याची संधी उपलब्ध होणार असून, देशाच्या प्रगतीत महिलांचा सहभाग अधिक बळकट होणार आहे. पदयात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या महिलांचे व नागरिकांचे त्यांनी आभारही मानले तसेच हे विधेयक मान्य होईपर्यंत आणि त्यानंतरही पाठिंबा कायम रहावा, तसेच नारी शक्ती वंदन अधिनियमला पाठींबा देण्यासाठी ९६६७१७३३३३ या नंबरवर मिस्ड कॉल द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

भविष्यातही महिलांच्या हक्कांसाठी व सक्षमीकरणासाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल, असा निर्धार जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी यावेळी व्यक्त केला. विकसित भारताच्या निर्मितीसाठी महिलांच्या शक्तीचा प्रभावीपणे उपयोग करून घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे सांगून हा कायदा भारताच्या लोकशाही व्यवस्थेत महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी पाऊल ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या पदयात्रेदरम्यान ‘भारत माता की जय’, वंदे मातरम, छत्रपती शिवाजी महाराज कि जय, राष्ट्रमाता सावित्रीबाई गूळ यांचा विजय असो, ‘राजमाता जिजाऊ यांचा विजय असो’, झाशीची राणी लक्ष्मीबाईंचा विजय असो, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा विजय असो, नारी शक्ती देशाची प्रगती, स्त्री सन्मान देशाचा अभिमान, ‘नारी शिकवा नारी वाचवा’, सशक्त नारी सशक्त भारत’, ‘सशक्त नारी समर्थ राष्ट्र’, 'तिच्या कष्टाने उभा राहतो संसार नारीशक्तीमुळेच उजळतो प्रत्येक परिवार' अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

## उद्धव कंठाळे यांना ध्येय फाउंडेशन च्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत :** जि.प.प्रा. शा.बोरकिनी ता.सेलू येथील उपक्रमशील शिक्षक उद्धव श्रीरंगराव कंठाळे यांना ध्येय फाउंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल त्यांचा समस्त नाभिक समाज बांधवांच्या वतीने सन्मान करण्यात आला.यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळचे सेलू तालुकाअध्यक्ष रमेश गोरे, शहराध्यक्ष बाळासाहेब प्रधान,कर्मचारी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांत अंभोरे, ह.भ.प.अशोकानंद



महाराज सावरगावकर, संदीप राऊत, सदाशिव बर्वे, गणेश काळे,अदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यकांत अंभोरे यांनी केले तर अशोक महाराज राऊत यांनी आभार मानले.

## अचलपूर तालुक्यात वासनी मध्यम प्रकल्पाच्या भूमिपूजनाचा भव्य सोहळा

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : वासनी मध्यम प्रकल्पाच्या कामासाठी अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न अखेर मार्गी लागला असून, या प्रकल्पाच्या कामाला गती देण्यात आमदार गजानन भाऊ लवटे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.मागील महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार लवटे यांनी वासनी मध्यम प्रकल्पाचा मुद्दा ठामपणे



मांडत, प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी शासनाकडे केली होती. त्यांच्या प्रयत्नांमुळे आता या महत्त्वाच्या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होत असून परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी असदपूर (ता. अचलपूर) येथे वासनी मध्यम प्रकल्पाच्या भूमिपूजनाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा ऐतिहासिक ठरणार असून, या प्रसंगी मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.या प्रकल्पामुळे परिसरातील शेतीला पाणीपुरवठा होऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, स्थानिक विकासाला देखील चालना मिळणार आहे.

## अवधूत गुप्ते यांच्या उपस्थितीत ‘जल्लोष तरुणाईचा’ सोहळा संपन्न; विविध क्षेत्रातील दिग्गजांचा ‘शिवरत्न पुरस्कारा’ने गौरव!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/प्रतिनिधी** : तरुणाईचा उत्साह, संस्कृतीचा अभिमान आणि सामाजिक भान यांचा अभूतपूर्व संगम अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहात पाहायला मिळाला. प्रसिद्ध गायक, गीतकार आणि संगीत दिग्दर्शक रोहित पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ‘जल्लोष तरुणाईचा’ या भव्य सांस्कृतिक सोहळ्याने महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रात नवी ऊर्जा निर्माण केली आहे. या कार्यक्रमाला ख्यातनाम गायक-दिग्दर्शक अवधूत गुप्ते आणि अमरावतीचे उपजिल्हाधिकारी सचिन शेजाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना प्रदान करण्यात आलेले ‘शिवरत्न पुरस्कार’. यामध्ये पुढील मान्यवरांचा गौरव करण्यात आला ॲड. के. डी. पाटील



(शिक्षण क्षेत्र)रसिक पाटील (उद्योजकता)श्रीकांत पाटील (शैक्षणिक सेवा)निहा राऊत (समाजसेवा)ॲड. विलास नाईक (साहित्यिक क्षेत्र) प्रीतम सुतार (निवेदन क्षेत्र) जगदीश पाटील (भजन क्षेत्र) महेश पाटील (सामाजिक क्षेत्र) प्रदीप वाघमारे( उद्योजक क्षेत्र) डॉ.मेघा घाटे( वैद्यकीय क्षेत्र) जगदीश पाटील (आगरी कोळी कलाक्षेत्र) मयूर नाईक (आगरी कोळी कलाक्षेत्र ) रोहित नाईक (व्हिडिओ दिग्दर्शक क्षेत्र) उज्वला चंदनशिव (सामाजिक क्षेत्र ) राजश्री वावेकर (राजकीय क्षेत्र)गणेश बंडा (गायन कला )आल्हाद पाटील (सामाजिक क्षेत्र) मंदार वर्तक (सहकार क्षेत्र )विष्णू बुवा वांवजेकर( भजन क्षेत्र )विशाल महाडिक ( संगीत क्षेत्र) राजेश खर्डे वेसावकर (कलाक्षेत्र) (गिर्यारोहक) शरविका म्हात्रे नलिनीताई मुंबईकर (महिला उद्योजक )जगदीश सावंत (सामाजिक क्षेत्र) शाहीर वैभव घरत (कला क्षेत्र )मंगेश म्हात्रे (हॉटेल उद्योजक) प्राची देवळे (महिला उद्योग) आदी २७ शिलेदारांना गौरविण्यात आले.

यासोबतच, 'निमा' स्पर्धेत उत्कृष्ट गीतकार म्हणून निवड झाल्याबद्दल रोहित पाटील यांचा विशेष सन्मान करण्यात आला. एशिया चषक विजेती मॉडेल दीपिका पाटील यांच्या ‘ कधी कधी असे वाटते’ या नवीन व्हिडिओ अल्बमचे ग्रँड उद्घाटन करण्यात आले. जिल्हाभरातून निवडलेल्या कराओके स्पर्धकांच्या अंतिम फेरीनेही कार्यक्रमात मोठी रंगत भरली.

कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या कलाकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अभंग आणि नृत्य सादर केले.

या प्रभावी सादरीकरणाने संपूर्ण नाट्यगृह शिवमय झाले होते आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह व अभिमानाचे भावना निर्माण झाली होती या सोहळ्याचे सर्वात कौतुकास्पद वैशिष्ट्य म्हणजे पेण येथील दिव्यांग शाळेतील विद्यार्थी आणि रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हटाळे येथील विद्यार्थ्यांना दिलेले विशेष निमंत्रण या अनोख्या अनुभवाबद्दल बोलताना मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख डॉ.संदीप दत्तात्रय वारगे म्हणाले की हा सोहळा या विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभर लक्षात राहील असा अविस्मरणी अनुभव ठरला.

रोहित पाटील यांच्या साथीला वैभव थोरवे सागर म्हात्रे या टिव्हीवर गाजलेल्या गायकांची साथ लाभली.

या यशस्वी कार्यक्रमामुळे नव्या पिढीला आपले कौशल्य सादर करण्यासाठी भक्कम व्यासपीठ मिळाले असून या सोहळ्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व्यवहारात मोलाची भर घातली आहे.

## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त सोयगाव येथे यज्ञ सप्ताहाची भक्तिमय सांगता



**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे:** सोयगाव शहरातील दयाळनगर येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड नामजप,यज्ञ सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळ्याची आज भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. दिनांक गुरुवारपासून सुरू झालेल्या या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.अखंड नामजप,गुरुचरित्र पारायण, विविध यज्ञ,दुर्गा सप्तशती व स्वामी चरित्र पठण यामध्ये दररोज मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला.दररोज सकाळी औदुंबर,प्रदक्षिणा,भूपाळी,

सामूहिक गुरुचरित्र वाचन,यज्ञ व नित्य स्वाहाकार,नैवेद्य आरती, मंत्रपुष्पांजली तसेच विशेष याग आयोजित करण्यात आले.दुपारच्या सत्रात दुर्गा सप्तशती,

स्वामी चरित्र पठण व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.सायंकाळी आरती, नित्यसेवा,गीतेचा पंधरावा अध्याय,मनाचे श्लोक, विष्णुसहस्त्रनाम व तुकाराम अभंग यांचे सामूहिक पठण करण्यात आले.सप्ताहा दरम्यान गणेश याग,मनोबोध याग,चंडीका याग,स्वामी याग,गीताई याग,रुद्र याग व मल्हारी याग असे विविध धार्मिक विधी पार पडले.आज समारोपाच्या दिवशी बली पूर्णाहूती,श्री सत्यदत्त पूजन व सकाळी साडेदहा वाजता महाआरती करण्यात आली.यावेळी उपस्थित भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत अखंड नामजपात सामील होत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.या कार्यक्रमासाठी यजमान म्हणून अनिल शेटे व सौ.शेटे यांनी सेवा दिली,तर गुरुजी शिवराम आगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व धार्मिक विधी पार पडले.स्वामी समर्थ मठाच्या अध्यक्षा मीनाक्षीताई वसंत काळे यांच्या नेतृत्वाखाली रेखाताई तायडे,संध्याताई मापारी,सुरेखा ताई जगताप,गौरी जगताप,स्नेहल म्हस्के,वसंत पठाडे,अनिता चौधरी,महेश चौधरी,अजित काळे, चोटूभाऊ इंगळे व इतर सेवेकऱ्यांनी परिश्रम घेऊन हा सप्ताह यशस्वी केला.या धार्मिक सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले.

## येणारी जनगणना बौद्धांसाठी निर्णायक – ॲड. किशोर गजभिये यांचे मत

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : दी स्कूल ऑफ नोबल थॉट तर्फे चालविण्यात येणाऱ्या पॉलिटिकल स्कूल अंतर्गत “राष्ट्रीय जनगणना आणि आंबेडकराईट बौद्धांची भूमिका” या विषयावर १२ एप्रिल २०२६ रोजी चारिका बुद्ध विहार, शिल्पा सोसायटी, नागपूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून आयुष्यमान ॲड. किशोर गजभिये (आयएएस, निवृत्त प्रधान सचिव, सामाजिक न्याय मंत्रालय, महाराष्ट्र शासन) उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, अनुसूचित जातींच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात निधी दिला जातो. तसेच नोकरीतील आरक्षणासाठीही अनुसूचित जाती हा निकष महत्त्वाचा आहे. त्यामुळे येणाऱ्या जनगणनेत अनुसूचित जातींची अचूक लोकसंख्या




निश्चित होणे अत्यावश्यक आहे.

त्यांनी आवाहन केले की, जनगणनेच्या नमुना फॉर्ममध्ये जातीच्या रकान्यात बौद्धांनी आपली मूळ अनुसूचित जात नोंदवावी, तर धर्माच्या रकान्यात “बौद्ध” अशी नोंद करावी. यामुळे देश व राज्यातील बौद्धांची अचूक लोकसंख्या निश्चित होऊन त्यानुसार लोकसभा-विधानसभा जागा व आरक्षणाचे प्रमाण कायम राहण्यास मदत होईल. तसेच १९९० मध्ये व्ही. पी. सिंग यांच्या काळातील संविधानिक अधिसूचनेनुसार बौद्ध धर्म स्वीकारलेल्या अनुसूचित जातींना सर्व हक्क मिळतात, याबाबत जनजागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दी स्कूल ऑफ नोबल थॉटचे संचालक डॉ. एन. व्ही. ढोके होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी साउथबरो कमिशन, पुणे करार, १९३५ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया कायदा, तसेच संविधानातील कलम ३३५ पर्यंत अनुसूचित जातींना आरक्षण मिळवून देण्यासाठी केलेल्या संघर्षाचा उल्लेख केला. हे आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी आणि बौद्धांची लोकसंख्या वाढवण्यासाठी जनगणनेत योग्य नोंद करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच अनुसूचित जातीतील लोकांचे बौद्ध धर्मात धर्मांतर वाढवण्यासाठी संघटित आणि नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. बी. पी. नारनवरे यांनी केले. या कार्यक्रमाला परिसरातील सर्व जाती-धर्मातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## लासलगाव येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर’ आयोजित; नागरिकांसाठी महसूल सेवा एका छताखाली

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा तात्काळ व सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने लासलगाव येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान’ अंतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालय प्रांगण, लासलगाव येथे होणार आहे.

या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे व लासलगाव मंडळ अधिकारी रूपाली सावळे यांनी केले आहे.शिबिरासाठी मंत्री छगनराव भुजबळ, खासदार भास्करराव भगरे, आमदार नरेंद्र दराडे, आमदार किशोर दराडे, नाफेडचे माजी संचालक नानासाहेब पाटील, बाजार समिती सभापती ज्ञानेश्वर जगताप, माजी आमदार कल्याणराव पाटील तसेच मुंबई बाजार समिती संचालक जयदत्त होळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मार्गदर्शक म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे (निफाड) उपस्थित राहतील. लासलगाव महसूल मंडळातील प्रियांका वाघ (लासलगाव), लक्ष्मीकांत शिंदे (टाकळी विंचुर), जनार्दन उशीर (खडकमाळेगाव), ईश्वरी देशमुख (पिंपळगाव नजिक) व सुप्रिया माळोदे (वनसगाव) यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, सरपंच, पोलिस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, कृषी अधिकारी, बीएलओ अधिकारी, महसूल सेवक, रेशन दुकानदार व सेतु कार्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या सोडविणार आहेत.टाकळी विंचुर, कोटमगाव, खडकमाळेगाव, सारोळे खुर्द, खानगाव नजिक, पिंपळगाव नजिक, वेळापूर, वनसगाव, ब्राह्मणगाव वनस, थेटाळे, निमगाव वाकडा, पाचोरे बु., पाचोरे खुर्द, ब्राह्मणगाव विंचुर, शिवापुर आदी गावांतील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल विभागाने केले आहे.या शिबिरामध्ये भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतरित जमिनींचे दुरुस्त सातबारा वाटप, ‘जिवंत सातबारा’ मोहिमेअंतर्गत नोंदी, सामाजिक अर्थसहाय्य योजनांच्या मंजुरी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखले वितरण, ‘सर्वांसाठी घर’ योजनेंतर्गत पट्टे वाटप, अभिलेख दुरुस्ती हेल्पडेस्क, सातबाऱ्यातील चुका दुरुस्ती, तात्काळ सुधारित सातबारा वितरण, अकृषिक हस्तांतरण नोंदी, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत आदेश वितरण, पोटखराबा क्षेत्राचे लागवडीयोग्य क्षेत्रात रूपांतर, प्रलंबित फेरफारांची निर्गती, लोकसेवा हक्क कायद्याअंतर्गत प्रमाणपत्रे, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान तक्रार निवारण अशा विविध सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उपक्रमामुळे महसूल विभागाच्या योजनांबाबत जनजागृती होऊन नागरिकांना जलद व प्रभावी सेवा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# पागोटे ग्रामपंचायतीवर महाविकास आघाडीचा गुलाल;

## शेकापच्या समृद्धी साईराज पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध वर्णी!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते वाजेकर शेठजी यांच्या आदेशानुसार १९६० मध्ये स्थापन झालेल्या पागोटे ग्रामपंचायतीमध्ये विकासाची परंपरा कायम राहिली आहे. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत महाविकास आघाडीने दणदणीत यश मिळवले असून, सरपंच पदासह १० पैकी १० जागा (१ सरपंच आणि ९ सदस्य) निवडून आल्या आहेत. या विजयानंतर आता उपसरपंचपदी शेतकरी कामगार पक्षाच्या समृद्धी साईराज पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

पागोटे गावच्या प्रगतीचा पाया पाटील घराण्याने भक्कम केला आहे. १९६० मध्ये गावाचे पहिले सरपंच म्हणून स्व. गणपत काथारी पाटील यांनी दोन टर्म कार्यभार सांभाळून लोकसेवेचा श्रीगणेशा केला. त्यानंतर स्व. दत्तू धर्मा पाटील यांनीही सरपंच म्हणून गावाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. या दोन्ही मान्यवरांच्या कार्यकाळात विविध शासकीय निधीतून गावात शाळा, रस्ते, तळे आणि पाणीपुरवठ्याची कामे मोठ्या प्रमाणावर होऊन गावच्या विकासाला गती मिळाली.

नवनियुक्त उपसरपंच समृद्धी पाटील या मनोहर गणपत पाटील यांच्या नातसून असून, शेकापचे ज्येष्ठ नेते स्व. दत्तू धर्मा पाटील यांच्याही नातसून आहेत. तसेच त्या मयूर दत्तू पाटील व हेमलता मयूर पाटील यांच्या सून आहेत. समृद्धी पाटील यांचे सासरे मयूर पाटील आणि हेमलता पाटील हे दोघेही नेहमीच गावातील सर्व सामाजिक आणि राजकीय कार्यात सक्रिय असतात, तसेच समृद्धी पाटील यांच्या कार्याला त्यांचे पती साईराज पाटील यांचाही मोलाचा सपोर्ट असतो. त्यांच्या याच अनुभवाचा आणि पाठिंब्याचा फायदा आता समृद्धी पाटील यांना मिळणार आहे .अशा प्रबळ वारसा लाभलेल्या घराण्यातील सून आता उपसरपंच म्हणून गावच्या विकासाचा वारसा पुढे नेणार आहे.



निवडीनंतर आपले मत व्यक्त करताना उपसरपंच समृद्धी पाटील म्हणाल्या की माझ्या घराण्याला मोठा राजकीय वारसा लावला आहे माझ्या पूर्वजांनी गावात जी मोठी विकास कामे केली आहेत तोच वारसा मी यापुढे निष्ठेने पुढे नेईन. ग्रामस्थांच्या विश्वासाला पात्र ठरून गावच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. पाटील कुटुंबासाठी हा दिवस आनंदाचा ठरला एकीकडे समृद्धी पाटील यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड आणि याच दिवशी त्यांच्या कन्येचा दुसरा वाढदिवस होता या योगायोगाने कुटुंबात आणि संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण दिसून आले .समृद्धी पाटील यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे .कार्यक्रमाच्या निमित्ताने पनवेलचे माजी सभापती काशिनाथ पाटील, माजी पंचायत समिती सदस्य रमाकांत पाटील ,जिल्हा परिषद सदस्य प्रेरणा पाटील ,पंचायत समिती सदस्य दीपक भोईर, परेश ठाकूर, ग्रामसेविका रेश्मा ठाकूर तसेच पागोटे सरपंच कुणाल पाटील व सर्व ग्रामपंचायत सदस्य पाटील कुटुंबीय मित्रपरिवार यांनी उपस्थित राहून अभिनंदनाचा वर्षाव केला.

निवड प्रक्रिया पूर्ण होऊन उपसरपंच पदाचा पदभार हाती घेतल्यानंतर पागोटे गावात बँड च्या तालावर समृद्धी पाटील यांची मिरवणूक काढण्यात आली. वडीलधाऱ्यांनी लावलेले हे रोपट आज एका मोठ्या वटवृक्षासारखं उभे आहे. आपल्या घराण्यातील पूर्वजांनी ज्या निष्ठेने गावाचा विकास केला त्याच निष्ठेने आणि मायेने ही सून आज विकासाचा वारसा पुढे घेऊन जाणार आहे.

---

## आदिवासी विद्यार्थिनी अल्का मरसकोल्हेची ‘खेलो इंडिया’ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये विजयी

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी अंतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा बीजेपार येथील विद्यार्थिनी कु. अल्का रामदास मरसकोल्हे हिने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ४×४०० मीटर रिले स्पर्धेमध्ये तिने कास्यपदक जिंकले पहिल्या ट्रायबल ‘खेलो इंडिया’ राष्ट्रीय स्पर्धे यश संपादन आहे.

या स्पर्धेच्या पात्रता फेऱ्या पालघर व झारखंडमधील रांची येथे पार पडल्या. या दोन्ही फेऱ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अल्काने मुख्य स्पर्धेपर्यंत मजल मारून छत्तीसगड येथे झालेल्या अंतिम फेरीत कास्यपदक पटकावले आहे. तिच्या या यशामुळे गोंदिया




जिल्ह्याचा तसेच महाराष्ट्राचा मान उंचावला आहे.

अल्का हिच्या या यशाबद्दल प्रकल्प अधिकारी श्री उमेश काशिद यांनी अभिनंदन केले आहे.हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण आदिवासी समाजासाठी व राज्यासाठी अभिमानाची बाब आहे.

‘एक आश्रमशाळा एक खेळ’ या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली बिजेपार आश्रमशाळेत मिळालेले विशेष प्रशिक्षण, संतुलित आहार व पुरेसे क्रीडा साहित्य यामुळे हे यश शक्य झाल्याचे सांगितले जात आहे. या यशामागे प्रकल्प अधिकारी श्री. उमेश काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा समन्वयक श्री. तुलसीदास बघाडे व मुख्याध्यापक श्री. अशोक इस्कापे यांचे नियोजन व समर्पण महत्त्वाचे ठरले. अल्काने आपल्या या उल्लेखनीय यशाचे श्रेय *आई-वडील* तसेच क्रीडा प्रशिक्षक *श्री. महेंद्र कचलाम* यांना दिले आहे.

अल्का मरसकोल्हे हिच्या या यशामुळे संपूर्ण गोंदिया जिल्ह्यात, आदिवासी समाजात तसेच आश्रमशाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

## तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी देश विश्वगुरू – प्रा. डॉ. प्रमोद नारायणे

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/लाखनी :** येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक प्रबोधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रा. डॉ. प्रमोद नारायणे यांनी सांगितले की, तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीमुळेच भारत देश विश्वगुरू बनू शकतो. त्यांनी आंबेडकरांच्या आदर्श संस्कृती, बुद्धिप्रामाण्यवाद, तत्वज्ञान आणि परिवर्तनवादी चळवळीवर सविस्तर भाष्य केले.डॉ. नारायणे यांनी आपल्या भाषणात चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन, मनुस्मृती दहन, धम्मदीक्षा सोहळा यांसारख्या ऐतिहासिक चळवळींचा उल्लेख करत सांगितले की, रक्ताचा



एकही थेंब न सांडता सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे अद्वितीय कार्य डॉ. आंबेडकरांनी केले.

यावेळी डॉ. सुधाकर सोनोने यांनी सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. “शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही” असे सांगत त्यांनी समता व न्यायासाठी शिक्षण आवश्यक असल्याचे नमूद केले.

तसेच प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे यांनी बुद्ध तत्त्वज्ञान आचरणात आणल्यास समाजाची प्रगती शक्य असल्याचे सांगितले. त्यांनी डोळस दृष्टिकोन व जागरूकतेची गरज अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेंद्र बनसोड होते. त्यांनी क्रांती, प्रतिक्रांती आणि परिवर्तनवाद याविषयी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेवाराम खोब्रागडे यांनी तर आभार प्रदर्शन विठ्ठल गणवीर यांनी केले.या प्रसंगी आशिष वी. ग. कांबळे, गजेंद्र गजभिये, विनोद रामटेके, सदानंद वासनिक, धम्मा रामटेके, शैलेश करवाडे, नामदेव काणेकर, सुमनताई काणेकर, वर्षा तिरपुडे, कमल गणवीर, साधना शिंगाडे, विना डोंगरे, नलिनी ढवळे यांच्यासह शेकडो उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## श्री साई सिद्धी सेवा संस्था येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : विलेपार्ले विभागातील सहार भागातील महाराणा प्रताप नगर अंतर्गत जोगेश्वरी पूर्व येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम श्री साई सिद्धी मंदिर सेवा संस्था (रजि.) यांच्या आवारात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारत माता यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिकरित्या बुद्ध वंदना घेत,



बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी परिसरातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात कार्यकर्ते देवेशजी मसुरेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेत, त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संवैधानिक योगदानाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचे आजच्या पिढीसाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. तसेच सुनील जी सावंत यांनीही मार्गदर्शन करताना बाबासाहेबांनी दिलेल्या समता, बंधुता आणि न्यायाच्या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजन कार्यकर्ती साक्षिका संजय प्रियोळकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. तसेच महेंद्र केळकर (अध्यक्ष) यांनी विशेष पुढाकार घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

शेवटी भारतमाता आरती, कल्याण मंत्र यांच्या पठणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या निमित्ताने परिसरात एकात्मता, सामाजिक जागृती आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प केला.


या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

---

## पोद्दार इंटरनॅशनल स्कूल बारामतीची विद्यार्थिनी कु .लावण्य निंबाळकर ठरली गौरवशाली

**दैनिक युवक आधार**

**सणसर : - विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील विध्यार्थीनी कु. लावण्य विशाल निंबाळकर हिने महाराष्ट्र सामान्य ज्ञान परीक्षा वर्ष २०२६ मध्ये गौरवशाली कामगिरी केली असून ती सध्या पोद्दार इंटरनॅशनल स्कूल,बारामती येथे शिक्षण घेणारी इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी आहे कु.लावण्य विशाल निंबाळकर हिने उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल तीचे सर्व स्तरातुन कौतुक केले जात



आहे.

भवानीनगर केंद्रामध्ये तिने तिसरा क्रमांक मिळवला असून जिल्हा पातळीवर पंधरावा तर राज्य पातळीवर विसावा क्रमांक मिळवण्याचा मान तिला मिळाला आहे. महाराष्ट्र सामान्य ज्ञान परीक्षेत एकूण १५० गुणांपैकी ११२ गुण मिळवून तिने ‘उत्कृष्ट’ दर्जा प्राप्त केला आहे.

कु लावण्य निंबाळकरची मातोश्री या एस.बी.पाटील इंजिनिअरिंग कॉलेज,इंदापूर येथे प्राध्यापिका म्हणून कार्यरत असून वडील प्रगतशील बागायतदार व शेतकरी कृती समिती भवानीनगरचे सदस्य आहेत. या यशामुळे शाळेचा व पालकांचा अभिमान वाढला असून लहान वयातच मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

---

## आ. अंतापूरकर यांचे प्रयत्न फळाला, शंभर खाटांचे दवाखाना बांधकामास निधी मंजूर

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे** : देगलूर (दि.१७) देगलूर उपजिल्हा रुग्णालयाच्या १०० खाटांच्या श्रेणीवर्धन दवाखाना इमारतीच्या बांधकामासाठी २२ कोटी ९७ लक्ष निधी मंजूर झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम,आधुनिक आणि दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या कामासाठी आ.जितेश अंतापूरकर यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता.त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत राज्याचे आरोग्यमंत्री मा. प्रकाशजी आबिटकर यांनी विशेष सहकार्य करत निधी मंजुरीसाठी पुढाकार घेतला.



दरम्यान,आ.अंतापूरकर यांनी मुंबई येथे आरोग्यमंत्री प्रकाशजी आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या निर्णयाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी त्यांनी देगलूर तालुक्यातील आरोग्य सुविधांच्या उन्नतीसाठी आणखी सहकार्य करण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

१०० खाटांच्या अत्याधुनिक रुग्णालय इमारतीमुळे देगलूर आणि परिसरातील रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही. स्थानिक स्तरावरच आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊन आरोग्य व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे.

तालुक्याच्या विकासासाठी अशाच पद्धतीने विविध प्रकल्प राबविण्यासाठी आपण कटिबद्ध असून,जनतेच्या सहकार्याने विकासकामांना पुढेही गती देण्यात येईल,असा विश्वास आ.जितेश अंतापूरकर यांनी व्यक्त केला.

---

## २६ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची मदत रखडली

### सिल्लोड तहसीलमध्ये निधी पडून ; ४ दिवसांत वाटप न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड:-** तालुक्यातील २६ पात्र आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी शासनाने मंजूर केलेला मदत निधी महसूल प्रशासनाकडे प्राप्त असूनही, त्याचे वितरण अद्याप झालेले नाही. प्रशासकीय उदासीनतेमुळे या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून, येत्या चार दिवसांत निधी न मिळाल्यास लाभार्थी वारसांसह तहसीलवर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपचे भवन मंडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

सिल्लोड तालुक्यातील २६ शेतकरी आत्महत्या प्रकरणांमध्ये




शासनाने तांत्रिक छाननी पूर्ण करून आर्थिक मदत मंजूर केली आहे. हा निधी महसूल विभागाकडे जमा आहे, मात्र प्रशासकीय स्तरावर वितरणाची प्रक्रिया लांबणीवर पडली आहे. कुटुंबप्रमुख गमावलेल्या या वारसांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असून, हक्काच्या मदतीसाठी त्यांना प्रतीक्षा करावी लागत आहे. प्रशासनाने या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून त्वरित पावले उचलणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या संदर्भात तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात एकनाथ हिवाळे यांनी स्पष्ट केले की, "मंजूर निधी असताना तो लाभार्थ्यांपर्यंत न पोहोचणे ही गंभीर बाब आहे. प्रशासनाने पुढील चार दिवसांत सर्व २६ पात्र कुटुंबांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करावी. विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास होणाऱ्या लोकशाही मार्गातील आंदोलनास सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील."

## लिंबागणेशकरांची आर्तहाक ; मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आज होत असलेल्या 'मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चात' सहभागी व्हा .:— डॉ .गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करत, सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उद्या दि.१७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या "एल्गार मोर्चा"ला लिंबागणेशकरांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांनी न्याय हक्कासाठी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. डॉ.गणेश ढवळे यांनी सांगितले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी नसून तो संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आहे. समाजातील शैक्षणिक



व सामाजिक मागासलेपण दूर करण्यासाठी शिक्षण, नोकरी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही दीर्घकाळापासूनची व न्याय्य मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील पिढीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी हा लढा आवश्यक असून, या ऐतिहासिक आंदोलनात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी डॉ.गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, रविंद्र निर्मळ, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे, अर्जुन घोलप, शेख शफी, नूर सय्यद, बाळासाहेब मुळे, समीर शेख, सय्यद अख्तर, सय्यद बशीर, रामदास मुळे, सुरेश निर्मळ, गणपत तागड, शेख शफीक, सय्यद सलीम, शेख वसीम, शेख उस्मान, सय्यद फिरोज, सय्यद रियाज, सय्यद ताहेर, सय्यद रऊफ, सय्यद सालम, उमर शेख, सय्यद नाझीम, शेख बबलू, सय्यद आरेफ, शेख नाझीम, शेख शौकत, सय्यद आयुब, भास्कर आबदार, बबन गोंडे सह आदी इतर नागरिक उपस्थित होते.

# संतांच्या सानिध्यात सुखाची प्राप्ती - ह.भ.प.रामराव महाराज ढोक

## गेवराई तालुक्यातील भडंगवाडीत सप्ताह उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**गेवराई:** मनुष्य जीवनात प्रत्येकाने मोह, माया, मद आणि मत्सर बाजूला ठेवून चिंता न करता भगवंताचे नामस्मरण करुन संतांच्या सानिध्यात रहावे यातच खऱ्या सुखाची प्राप्ती होते असे प्रतिपादन सुप्रसिद्ध रामयणाचार्य ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांनी केले.

स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा श्री नगद नारायण महाराज यांच्या कृपेने मौजे भडंगवाडी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात बुधवारी सातवे कीर्तनरुपी पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी श्रीक्षेत्र नारायणगडाचे उत्तराधिकारी



संभाजी महाराज, बप्पासाहेब तळेकर, सखाराम मस्के, रणजित मस्के , ज्ञानेश्वर नवले, रसाळ बापू, श्रीकुमार म.ठोसर, माऊली म.औटे, गोकुळ म.उबाळे, विठ्ठल म. गलधर, रमेश म.आटपळे, जेष्ठ पत्रकार शिवाजी ढाकणे,पत्रकार विनोद पौळ, तुकाराम धस ,परमेश्वर म.वाघमोडे, सुंदर धस, पत्रकार श्री साईनाथ गावडे ,झेंडे सह आदि संत-महंत, टाळकरी, वारकरी, गायक, वादक, भजनी मंडळ, तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगद्गुरु संत तुकोबाराय यांच्या देवा आता ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ।। तरीच हा जीव सुख पावे माझा । बरे केशीराजा कळों आले ।। ठाव देई चित्ता राखे पायांपाशी । सकळ वृतींसी अखंडित ।। आस भय चिंता लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ।। मागणे ते एक हेचि आहे आता । नाम मुखी संतांसंगे देई ।। तुका म्हणे नको वरपंग देवा । घेई माझी सेवा भावशुद्ध ।। या अभंगावर त्यांनी सुंदर असे विवेचन केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की, भगवंताने आपल्याला हा मनुष्यरुपी देह परमार्थ करण्याकरिता दिलेला असून मोह, माया, मद, मत्सर, द्वेष आणि चिंता हे मनाचे सहा प्रमुख शत्रू आहेत, जे माणसाला विचलित करुन प्रगती व शांतीपासून दूर नेतात. हे विकार दुःखाची कारणे असून मानवी जीवनातील संवेदना कमी करतात. तरी प्रत्येकाने जीवनात भगवंताचे नामस्मरण करुन सुख ,समाधान आणि सुखाची प्राप्ती करुन घ्यावी असा मौलिक सल्लाही त्यांनी दिला.तर यावेळी त्यांनी शेवटी पत्रकार बांधवांचे तोंडभरुन कौतुक केले. ते म्हणाले की, पत्रकारांच्या विषयी मला आदर आणि प्रेमभाव आहे. आपला हा कार्यक्रम चंदन आहे

परंतू चंदनाचा सुगंध संबंध देशात दरवळाण्यासाठी पत्रकार बांधवांचे खरे योगदान आहे. तसेच भडंगवाडी छोटी असली तरी सर्वांच्या एकीने येथील सप्ताह भव्य झाला याचा आनंद आहे. यावेळी भडंगवाडी व पंचक्रोशीतील टाळकरी, वारकरी, गायक, वादक, भजनी मंडळ, तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त येथे मा.रमाबाई कॉलनीत जल्लोष साजरी

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** सोयगाव तालुक्यातील आमखेडा येथील माता रमाबाई कॉलनीत दि.१४ एप्रिल २०२६ रोजी विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आमखेडा येथे भव्य व उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या जयंतीचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रुप, मातोश्री रमाबाई कॉलनी,आमखेडा यांच्या वतीने करण्यात आले.कार्यक्रमात ग्रामस्थ व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.यावेळी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच



त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

सामाजिक एकता,शिक्षण आणि समतेचा संदेश देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक पंकज बारवाल उपस्थित होते यावेळी सागर श्रीखंडे,बाळू भाऊ बेदवे, समाधान गायकवाड,सुमित गायकवाड,अजय गायकवाड,अजय पगारे, आदित्य बारी,आकाश गायकवाड,आनंद गायकवाड, यश पगारे,प्रजोत शिरसाट, प्रतीक प्रधान,वसंत निकम, गवणाजी नरवाडे,शिकंदर तडवी,अनिल पगारे,गौतम सोनवणे,अनिल गायकवाड, संदीप पगारे,भीमराज साबळे, विजय पगारे,अनिकेत निकम, सचिन ओहोळ,गौतम गायकवाड,योगेश पगारे, सुनील पगारे,विजय पगारे, निलेश निकम,सुमेध गायकवाड,अशोक खरात, सचिन वाघ आदी उपस्थित होते.तसेच महिला वर्गातून शोभा श्रीखंडे,छाया पगारे, संगीता पगारे,सुमनबाई गायकवाड,कस्तुराबाई पगारे,करुणाबाई निकम,वंदनाबाई गायकवाड,उषाबाई गायकवाड,छायाबाई गायकवाड,दिपाली पगारे, साईजाबाई निकम,विमलबाई प्रधान,मनीषाबाई गायकवाड,आशाबाई कांबळे,लताबाई कांबळे,सुशिलाबाई साबळे, सुनीताबाई पगारे,मंगलाबाई निकम,सुरेखा बाई वाघ,भारती बारी,रेणुका श्रीखंडे,ज्योतीबाई ओहोळ,सुनिता खरात,अनुराधा रगडे यांनीही उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान बाबासाहेबांच्या विचारांचे महत्व पटवून देण्यात आले तसेच युवकांनी समाजकार्यासाठी पुढे यावे,असे आवाहन करण्यात आले.संपूर्ण परिसरात जयंतीनिमित्त उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

## "तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथून ब्रम्हांडनायक सद्गुरु श्री स्वामी समर्थ यांचे पुण्यतिथी कार्यक्रमाहुन आलेल्या महिलांचा सन्मान



**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर :** ब्रह्मांडनायक सद्गुरु श्री स्वामी समर्थ यांचे पुण्यतिथीचे औचित्य साधून मंडळाच्या सचिव सौ. चंद्रकला सूर्यकांत भिसे आपल्या महिला सदस्यांसह ब्रह्मांडनायक सद्गुरु श्री स्वामी समर्थ यांच्या अक्कलकोट नगरी मधून दर्शन घेऊन पिलीव मध्ये आले असता रसाळ व देवकर परिवारातर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सौ. चंद्रकला सूर्यकांत भिसे यांनी जास्तीत जास्त महिलांनी स्वामींच्या सेवेमध्ये सहभागी होऊन धार्मिक कार्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. स्वामींची सेवा निश्चितच आपल्याला कोणत्याही रूपाने फलदायी ठरत असते असे सांगून त्यांच्या जीवनातील अनेक अनुभव महिला सदस्यांना समजावून सांगितले.

## स्पा पॅलेस नावाच्या सेंटरमध्ये पोलिसांची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर परिसरात सर्व काही नेहमीसारखंच सुरू होतं लोक आपल्या कामात व्यस्त, रस्त्यांवरची वर्दळ आणि एका स्पा सेंटरमध्ये चालणारी शांत हालचाल. बाहेरून पाहता सर्व काही व्यवस्थित वाटत असलं, तरी आत मात्र एक वेगळंच वास्तव लपलेलं होतं.गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला एक गुप्त माहिती मिळाली. स्पा पॅलेस नावाच्या सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याची खबर मिळताच पोलीस यंत्रणा सतर्क झाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे आणि त्यांच्या पथकाने लगेचच योजना आखली. एक बनावट ग्राहक त्या स्पा सेंटरमध्ये पाठवण्यात आला. काही वेळातच त्या ग्राहकाकडून मिळालेल्या सांकेतिक इशाऱ्याने सर्व चित्र स्पष्ट झाले आणि क्षणातच पोलिसांनी धाड टाकली. स्पाच्या आत जे दृश्य दिसले, ते धक्कादायक होते. ७ महिलांना जबरदस्तीने या धंद्यात अडकवण्यात आले होते. त्यांना मसाजच्या नावाखाली ग्राहकांसमोर उभं केलं जात होतं. या सगळ्यामागे होती स्पाची मॅनेजर नितू हजारीलाल प्रजापत. ती महिलांना कामाच्या नावाखाली आणून, त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत होती. प्रत्येक ग्राहकाकडून हजारो रुपयांचा मोबदला घेतला जात होता. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सर्व महिलांची सुटका केली आणि आरोपी मॅनेजरला अटक केली. सुटका करण्यात आलेल्या महिलांमध्ये ४ थायलंडमधील, २ मिझोराम आणि १ मणिपूर येथील महिला असल्याचे समोर आले. या संपूर्ण कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या अनैतिक धंद्यांवर पोलिसांनी पुन्हा एकदा कठोर पाऊल उचलल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आंबेडकरी तत्वज्ञान आणि विचार आजही प्रेरणादायी : प्रा .सुरेश भोये

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या सहसंचालक उच्च शिक्षण विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वकृत्व १८ तास अभियानाअंतर्गत ता.१४ रोजी भारतीय राज्यघटनेने शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर प्रा. सुरेश भोये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय राज्यघटनेची




मुलतत्व, मुलभूत अधिकार यासंदर्भात सखोल माहिती दिली. पहिले कायदामंत्री, पत्रकार, वकील, हिन्दू कोड बील लागू केले, अर्थतज्ज्ञ होते त्यांची किर्ती जगभरात गाजली आहे शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मुलमंत्र आजही महत्त्वाचा आहे असे सांगितले.यावेळी कार्यक्रमाला प्रा.कृष्णा गांगोडे, प्रा. सुभाष कामडी,मोहण जोपळे, हेमंत चौधरी,ओमकार धुम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थी उपस्थित होते.

## जळगाव जिल्ह्यात १६१० रुग्णांना सुमारे १३.३३ कोटी रूपयांची वैद्यकीय मदत

**जळगाव :** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. जळगाव जिल्ह्यात आर्थिक वर्षात १६१० रुग्णांना सुमारे १३ कोटी ३३ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे. कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त ७५ अभंगांचे शनिवारी लोकार्पण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नाद ब्रह्म साधना मंडळाच्यावतीने निर्मित करण्यात आलेल्या 'प्रचलित रागांवर आधारित ७५ अभंगांचे लोकार्पण शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी सायंकाळी ०५ वाजता पनवेल येथे होणार आहे. मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणाऱ्या या लोकार्पण सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व नगरसेवक परेश ठाकूर, पं. निवृत्तीबुवा चौधरी, नाद ब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंत पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या अभंगांची रचना व सादरीकरण विविध अनवट आणि पारंपरिक रागांवर आधारित चालींमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे नवोदित विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध व सुसूत्र ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेतील रागसंवर्धन आणि सातत्यपूर्ण जतन हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असून या उपक्रमामुळे भक्ती, संगीत आणि संस्कार यांचा सुंदर संगम समाजास अनुभवता येणार आहे. अभंगांच्या माध्यमातून आध्यात्मिक मूल्यांची जपणूक होऊन नव्या पिढीसमोर एक आदर्श उभा राहणार आहे. या उपक्रमामुळे अमृत महोत्सव वर्षाला आणखी एक सांस्कृतिक व आध्यात्मिक अधोरेखा लाभली आहे.

## लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची १० वी सी. बी. एस. ई. बोर्ड परीक्षेत गौरवशाली कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे :** येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल या सी. बी. एस. ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा १००% निकाल लागला असून शाळेतील ग्रीशा भंडारी ९६.२०% प्रथम क्रमांक , साक्षी ढोबळे ९२.६०% द्वितीय क्रमांक, विराट पालकर९१.६०% तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर १३ विद्यार्थ्यांनी ८० % पेक्षा जास्त गुण संपादन करून विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण होत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीला आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाला यशाचे







फळ मिळाले आहे.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री. अमित राठोड, उपाध्यक्ष श्री. संदीप चानोदिया, सचिव श्री. हेमंत मेहेर, कोषाध्यक्ष डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी श्री. मनीष गांधी, श्री. प्रकाश श्रीश्रीमाळ, श्री. अमोल पटवा, श्री. संजय पितळे, श्री. संतोष गांधी, मुख्याध्यापक श्री. के. अभिलाष , सल्लागार श्री. पी.जी. मेहेर सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिकांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या ९६ विद्यार्थ्यांचे सीबीएसई दहावी परीक्षेत यश

## सलग सोळाव्या वर्षी न्यु व्हिजन पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल

**अंबाजोगाई :** केंद्रिय शिक्षण मंडळ अर्थात सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन तर्फे फेब्रुवारी आणि मार्च-२०२६ महिन्यांत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल बुधवारी वेबसाईटवर जाहीर झाला. त्यात येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यु व्हिजन पब्लिक स्कूलने दहावी सी.बी. एस.ई बोर्ड (इंग्रजी माध्यम) परीक्षेत सलग १६ व्या वर्षीही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या शाळेचे परीक्षेसाठी बसलेले सर्वच्या सर्व ९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. घवघवीत यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अंबाजोगाई येथे राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकार्यांनी एकत्र येत सन २००४ साली श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देणाऱ्या न्यु व्हिजन पब्लिक स्कूल या शाळेची स्थापना केली. शाळेने स्थापनेपासून १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रुवारी - मार्च-२०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत शाळेच्या सर्वच्या सर्व ९६ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादीत केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी गुणवत्तेत नवा उच्चांक निर्माण करून पुन्हा एकदा अंबाजोगाईचे नांव शैक्षणिक क्षेत्रात उंचावले आहे. शाळेतून प्रथम येण्याचा बहुमान प्रतिक धनराज घुले (९८.२० टक्के) या विद्यार्थ्याने पटकावला. तर शौनक मंगेश अकोलकर (९८.०० टक्के) या विद्यार्थ्याने शाळेतून द्वितीय, अनन्या संदीप चव्हाण (९६.०० टक्के) हिने तृतीय आणि संचित सुशीलकुमार मुकडे (९५.४० टक्के) गुण मिळवत गुणानूक्रमे चतुर्थ क्रमांक प्राप्त केला आहे. शाळेच्या २० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. ३० विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत तर ११ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. तसेच ३५ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपर्यंत गुण प्राप्त केले आहेत. असे सर्व मिळून ९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

न्यु व्हिजन पब्लिक स्कुल, अंबाजोगाईचा सीबीएसई बोर्ड परिक्षा इयत्ता १० वी चा १०० टक्के निकाल; गुणवंत विद्यार्थी



प्रतिक धनराज घुले (९८.२० टक्के) शौनक मंगेश अकोलकर (९८.00 टक्के) अनन्या संदिप चव्हाण (९६.00 टक्के) संचित सुशिलकुमार मुकडे (९५.४० टक्के)

यातील अनेक विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयात शंभर पैकी शंभर गुण प्राप्त झाले आहेत हे विशेष होय. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, सौ.डिंपल मोदी तसेच ज्येष्ठ मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, उपप्राचार्य प्रा.वसंतराव चव्हाण, प्राचार्य डी.एच.थोरात, प्रा. एस.ए.बिराजदार, प्रा.राघवेंद्र राजमान्य, समन्वयक विनायक मुंजे, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य पांडुरंग पाटील, समन्वयक रवींद्र राजगुरू, वर्ग शिक्षक नितीन जोशी, प्रविण कुमार, जयशंकर त्रिपाठी तसेच विषय शिक्षक गोपाल कृष्णा, हेमलता मस्के, जयंती दाम, दत्तात्रय नेवल, प्रकाश पांडे, शुभांगी विजापुरे, प्रियंका गित्ते, स्नेहाशिष कुमार, सर्व शिक्षकवृंद आदींनी अभिनंदन करून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. न्यु व्हिजन पब्लिक स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जाते. याशिवाय नियमित अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांमध्ये एआयच्या आधुनिक काळात उपयोगी पडतील अशी कौशल्ये जसे की, तज्ज्ञ, अनुभवी व प्रशिक्षित शिक्षक वर्ग, अटल टिंकरींग आणि रोबोटिक्स लॅब, स्वतंत्र फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी लॅब, प्रत्येक वर्ग खोली मध्ये अद्ययावत सीसीटीव्ही कॅमेरा सुविधा, डिजिटल टिचिंग बोर्ड, मॅथ्यस् लॅब, कला व संगीत विषयक विशेष प्रशिक्षण, सुसज्ज कला व क्रीडा विभाग, सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने सहभाग आणि स्पृहणीय यश, या सोबतच स्कूल बस, बास्केटबॉल ग्राउंड, स्केटिंग ग्राउंड, थ्री डी पेंटिंग, ब्लॉक कोडींग, कृत्रिम बुध्दीमता या विषयीच्या कार्यशाळेचे आयोजन केले जाते. याच संस्थेने टॉडलर्स व्हिले प्री स्कूल ही सुरू केले आहे.

या प्री स्कूल मध्ये नर्सरी, एल.के.जी., यु.के. जी. वर्गाची दर्जेदार शिक्षण, अद्ययावत क्रीडांगणे, कृती युक्त अध्यापनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वेळोवेळी सरकारने जाहीर केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी लगेचच व प्रत्यक्षात सुरू करणारी न्यु व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाईतील पहिली शाळा ठरली आहे. शाळेने नेहमीच शासन नियमांचे पालन करून गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला आहे. शाळेचे माजी विद्यार्थी हे देशात व परदेशात आज मोठ्या पदांवर, हुद्द्यांवर कार्यरत असून ते विविध क्षेत्रात यशस्वी करीअर करीत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना नर्सरी, एल.के. जी. यू.के.जी. पहिली ते बारावी पर्यंत सीबीएसई बोर्डाच्या माध्यमातून शिक्षण घ्यायचे आहे त्यांनी कृपया अधिक माहितीसाठी व प्रवेशासाठी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कूल, मोदी लर्निंग सेंटर, रिंग रोड, अंबाजोगाई, जि.बीड येथील (मोबाईल - 8622031111) या क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

**न्यु व्हिजन पब्लिक स्कूल मधून मिळते दर्जेदार इंग्रजी शिक्षण - संकेत मोदी**

अंबाजोगाईत मुंबई, पुणे, नागपुर व छत्रपती संभाजीनगरच्या धर्तीवर इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी न्यु व्हिजन पब्लिक स्कूल सुरू केले. या शाळेने सतत १६ वर्षे १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवून संस्थेने गुणवता जोपासली आहे. संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत शैक्षणिक क्षेत्रात अंबाजोगाई पॅटर्न निर्माण केला आहे. येथे नर्सरी, एल.के.जी. यू.के. जी. पहिली ते बारावी पर्यंतचे मराठी व इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण दिले जाते. अनुभवी व समर्पित शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तिमत्व विकास, सुसज ग्रंथालय, ऑडिओ व्हिज्युअल क्लासरूम, अत्याधुनिक प्रयोगशाळा, वायफाय परिसर, भाषा विषयक प्रयोगशाळा, गणित व विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंगद्वारे प्रशिक्षण, प्रत्येक वर्गात सिसिटीव्ही कॅमेरा, कला, हस्तकला, मुख्य, संगीत, कराटे प्रशिक्षण, पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी आद्ययावत इमारत बास्केटबॉल ग्राउंड, प्रशस्त क्रिडांगण, स्पर्धा परीक्षेसाठी स्वतंत्र वर्ग या सोबतच सुसज्ज वसतीगृह, प्रत्येक खोलीत प्रसाधनगृह, प्रत्येक खोलीत चार विद्यार्थी, संतुलित व पोषक आहार, दैनंदिन योगा आणि व्यायाम. सकाळी व संध्याकाळी अभ्यासवर्ग, अनुभवी व काळजीवाहक कर्मचारीवृंद, लाँड्री सुविधा, मुलींसाठी स्वतंत्र सुविधा, २४ तास वैद्यकिय व विद्युत सुविधा यासोबतच विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत, स्पर्धेत विद्यार्थी यशस्वी झाला पाहिजे याकरीता जे-जे करता येईल ते सर्वच सर्वोत्कृष्ट देण्याचा आमचा प्रयत्न आहेत. अंबाजोगाईत पहिले सीबीएसई कॉलेज म्हणून न्यु व्हिजन पब्लिक सिनियर सेकन्डरी स्कूल ओळखले जात आहे. अशी माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी दिली आहे.

# अनधिकृत बांधकामांना लगाम लागणार; उद्योगांना दिलासा देणारे निर्णय

**पालघर :** वाडा तालुक्यात विविध कंपन्यांकडून होत असलेल्या अनधिकृत बांधकामांच्या तक्रारी आणि औद्योगिक बांधकाम परवानगी प्रक्रियेत उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने निर्णायक पावले उचलली आहेत. जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती कार्यालय, पालघर येथे झालेल्या बैठकीत उद्योग सुलभतेसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, सहायक संचालक नगर रचना भाग्यश्री ढवळसंक, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र) रणजित देसाई, उद्योग विभागाचे सरव्यवस्थापक उपेंद्र सांगळे, सहायक वनसंरक्षक





डेमरे तसेच तहसीलदार सचिन भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. वाडा तालुक्यातील अनेक उद्योजकांनीही सहभाग नोंदवला.

जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ अन्वये अकृषिक वापर परवानगीसंबंधी कलमे रद्द करण्यात आली असून औद्योगिक बांधकामासाठी आता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत संबंधित प्राधिकरणाकडे थेट अर्ज करता येणार आहे. यामुळे परवानगी प्रक्रियेत गती येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, एकरकमी रुपांतरण अधिमूल्य भरल्यानंतर पुन्हा अधिमूल्य भरण्याची आवश्यकता नसल्याची सुधारणा स्पष्ट करण्यात आली. Ease of Doing Business धोरणानुसार विविध विभागांकडून आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे (NOC) एका महिन्याच्या आत देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बैठकीत नगर विकास विभागाच्या Building Permission Management System (BPMS) व Auto DCR या ऑनलाईन प्रणालींच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उद्योजकांना ७/१२ उतारा तसेच ९(३), ९(४) नोंदी ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करून अर्ज प्रक्रियेत वेळेवर सादर करण्याचेही प्रशिक्षण देण्यात आले.

उद्योग विस्ताराला चालना देण्यासाठी उद्योग विभागाच्या विविध योजनांची माहिती देत, प्रशासन उद्योजकांच्या सर्व समस्यांवर सकारात्मक दृष्टीकोनातून उपाययोजना करेल, असे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी स्पष्ट केले. यासाठी दर महिन्याला अशा प्रकारची बैठक आयोजित करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

वाडा इंडस्ट्रियल असोसिएशनचे उपाध्यक्ष मिलिंद वाडेकर यांनी जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. कार्यक्रमाचा समारोप निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे यांनी केला.

# प्रा .सुदाम अहिरराव आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**ठाणे :** जोशी - बेडेकर महाविद्यालयातील प्रा.सुदाम अहिरराव यांना तेजस्वी अँकँडमीतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर वक्त्या पूर्णिमा शिंदे, सामाजिक कार्यकर्ते बाबुराव शिंदे, निरूपणकार प्रा.



प्रज्ञा पंडित, कवी श्रीप्रकाश सप्रे उपस्थित होते. विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून ते ओळखले जातात. त्यांची स्थूल अर्थशास्त्र, सूक्ष्म अर्थशास्त्र आणि जागतिक दृष्टिकोनासह भारतीय अर्थव्यवस्था ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यासोबतच व्यवसाय अर्थशास्त्राच्या विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी पाच लघु संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांचे सात संशोधन निबंध प्रकाशित झाले आहेत.आपल्या यशाचे श्रेय त्यांनी जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक यांना दिले.या पुरस्काराबद्दल अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# ऊर्जा विभागातील भरती प्रक्रियेचा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर साकोरे यांच्याकडून आढावा

**मुंबई :** ऊर्जा विभागातील भरती प्रक्रिया व प्रतीक्षा यादी संदर्भातील आढावा ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी घेतला. भरती प्रक्रियेबाबत आवश्यक सुधारणा करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

एमएसईबी होल्डिंग कंपनी कार्यालयात झालेल्या या बैठकीस महानिर्मितीचे कार्यकारी संचालक नितीन वाघ, महावितरणचे कार्यकारी संचालक राजेंद्र पवार,





महापारेषणच्या कार्यकारी संचालक सुचिता भिकाने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या, भरती प्रक्रियेच्या अंतर्गत निकाल आणि प्रतिक्षा यादीबाबत स्पष्ट सूचना देण्यात याव्यात. तिन्ही कंपन्यांच्या भरती धोरणामध्ये एकसमानता (युनिफॉर्मिटी) आणण्यात यावी. दिव्यांग, एसइबीसी/ईडब्ल्यूएस तसेच प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यात यावी आणि आयबीपीएस कंपनीमार्फत भरती प्रक्रिया राबविताना उमेदवारांचे गुणांसह निकाल अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावेत.

तसेच ऊर्जा विभागातील रिक्त पदांचा नियमित आढावा घेऊन त्यानुसार विभागातील भरती प्रक्रिया राबवावी अशा सूचना ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषणच्या अधिकाऱ्यांना दिल्या.





**ठाणे : भारतीय जनता पार्टीच्या वतीने नारीशक्ती वंदन कार्यक्रमांतर्गत आज लोकमान्य नगर इथून एका पदयात्रेचा आयोजन करण्यात आले होते त्यावेळी हजारो महिला या नारीशक्ती पदयात्रा मध्ये सामील झाले होते यावेळी स्वप्नाली साळवी महिला मोर्चा अध्यक्ष ठाणे शहर जिल्हा यांच्या नेतृत्वात नारी शक्ती वंदन समर्थनार्थ पदयात्रा संपन्न झाली या पद यात्रेत उत्स्फूर्त संखेने सर्व सामान्य महिला सामील झाल्या होत्या,जिल्हा सरचिटणीस समीरा भारती , नगरसेविका तथा प्रदेश सचिव मृणाल पेंडसे,महिला नगरसेविका नंदा पाटील,कमल चौधरी, अर्चना मनेरा, उषा वाघ,अनिता ठाकूर,अनिता यादव,नम्रता कोळी,माधुरी मेटांगे सरचिटणीस महिला मोर्चा विद्या कदम,रक्षा यादव, स्नेहा शिंदे तसेच असंख्य संखेने महिला मोर्चा पदाधिकारी कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.**





**ठाणे : भारतीय रेल्वे आपला स्थापना दिवस १६ एप्रिल रोजी साजरा करते; या दिवशी, म्हणजेच १६ एप्रिल १८५३ रोजी, बोरी बंदर (मुंबई) ते ठाणे दरम्यानच्या पहिल्या प्रवासी रेल्वे प्रवासाची आठवण जपली जाते. १६ एप्रिल २०२६ रोजी, रेल्वे आपल्या १७३ वर्षांचा उत्सव साजरा करत आहे.**





**ठाणे : ठाण्यातील पाचपाखाडी परिसरामध्ये वृक्ष उन्मळून पडल्यामुळे दोन दुकानं आणि एका हॉटेलचं मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झालेला आहे. सुदैवाने कोणताही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. घटनास्थळावरती आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशामक दलाच्या पथकाने दाखल होऊन त्वरितच झाड बाजूला सारले.**